रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक १६३
www.ramprahar.com
# रामप्रहर
◆मंगळवार, ३० डिसेंबर २०२५◆पाने ८◆किंमत ₹२

## अंतरंग
नवी मुंबई विमानतळावर टॅक्सी, रिक्षाचे नवे भाडेदर/२
अल्पवयीन मुलीशी अश्लील वर्तन करणारा अटकेत/५
'एमसीए'च्या स्पर्धेतील मुलींचे सामने रायगडात/८

## सर्व राज्यांनी उत्पादकतेला प्रोत्साहन द्यावे -पीएम मोदी

**नवी दिल्ली :** भारताला जागतिक सेवापुरवठ्याचे महाकेंद्र बनवण्यासाठी सर्व राज्यांनी उत्पादकतेला



प्रोत्साहन द्यावे तसेच व्यवसायसुलभ धोरणांना चालना द्यावी, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांच्या राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. प्रत्येक राज्याने या परिषदेत झालेल्या विचारविनिमयाला अनुसरून १० वर्षांसाठीचा कृती आराखडा तयार केला पाहिजे. लवकरच देशाचे राष्ट्रीय उत्पादकता अभियान सुरू होणार आहे. प्रत्येक राज्याने त्याला प्राधान्य द्यावे आणि जागतिक गुंतवणुकदारांना आकर्षित करतील अशा पायाभूत सुविधा उभाराव्यात. मेड इन इंडिया म्हणजे दर्जा असे समीकरण तयार झाले पाहिजे. भारत जगाचा अन्नदाता बनू शकतो. त्यासाठी उच्च दर्जाच्या शेती, दुग्धोत्पादन, मत्स्यव्यवसाय यांनी निर्यातीवर लक्ष केंद्रित करून सुधारणा कराव्यात, असे पंतप्रधान म्हणाले.

## पनवेल मनपा निवडणुकीसाठी महायुतीची घोषणा
# महाविजयाचा निर्धार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) यांची महायुती सोमवारी (दि. २९) पत्रकार परिषदेच्या माध्यमातून अधिकृतपणे जाहीर करण्यात आली. या पत्रकार परिषदेत महायुतीच्या नेत्यांनी एकत्रितपणे उपस्थित राहून निवडणूक रणनीती आणि आगामी वाटचालीबाबत भूमिका स्पष्ट केली.

महापालिकेच्या एकूण ७८ जागांपैकी ७१ भाजप, चार शिवसेना, दोन राष्ट्रवादी काँग्रेस, तर एक जागा आरपीआयला असा फॉर्म्युला या वेळी जाहीर झाला. पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथे झालेल्या या पत्रकार परिषदेत येथील भाजपचे महापालिका निवडणूक प्रमुख आमदार महेश बालदी आणि महायुतीच्या नेत्यांनी ही घोषणा केली. त्या अनुषंगाने पुन्हा एकदा पनवेल महापालिकेत मोठा विजय मिळवत महायुतीची सत्ता येणार असल्याचा विश्वास महायुतीच्या नेतेमंडळींनी व्यक्त केला.

या पत्रकार परिषदेस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शिवदास कांबळे, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, **(पान २ वर..)**

**पनवेल ही प्रचंड विकासाची क्षमता असलेली महापालिका म्हणून नावारूपाला आली आहे. पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात विकासगंगा आली आहे. या विकासाला दिशा देण्यासाठी केंद्र, राज्याप्रमाणे महापालिकेतही महायुतीची सत्ता आली पाहिजे. लोकांपर्यंत विकास पोहचवण्याचे काम करण्यात आले व येत आहे. लवकरच जाहीरनामा प्रसिद्ध करून लोकांपर्यंत पोहचवणार आहोत.**
**-प्रशांत ठाकूर**, आमदार

### परिसराच्या विकासाला प्राधान्य!
पनवेल शहर परिसराच्या विकासासाठी भाजप महायुतीने सातत्याने काम केले आहे. शहराचा सर्वांगीण विकास, नागरिकांच्या मूलभूत सुविधा, स्वच्छता, पायाभूत सोयीसुविधा, शिक्षण, विविध योजना, आरोग्य व पारदर्शक प्रशासन पनवेल महानगरपालिकेत पहायला मिळाले आहे. त्यामुळे पुढील काळातही पनवेलच्या विकासाला केंद्रबिंदू मानून भाजप काम करणार आहे. त्यामुळे पुन्हा एकदा पनवेलकर नागरिकांचा विश्वास आणि पाठिंबा महायुतीला निश्चित मिळणार आहे.

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची संख्या येथे तुलनेने कमी असली तरी प्रत्येक कार्यकर्त्याला सन्मान मिळाला पाहिजे ही भूमिका राहिली आहे. महायुती म्हणून आम्ही समाधानी आहोत आणि भक्कमपणे निवडणुकीला सामोरे जात महायुतीची सत्ता महापालिकेत आणणार आहोत.**
**-शिवदास कांबळे,** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते

**मागील वेळी आरपीआयचे उमेदवार भाजपच्या चिन्हावर निवडून आले होते. या वेळीही आम्हाला सत्तेत सहभागी करून घेतले आहे. त्यामुळे आम्ही समाधानी असून महायुतीचे उमेदवार जास्तीत जास्त मतांनी निवडून येण्यासाठी प्रयत्नशील असणार आहोत.**
**-नरेंद्र गायकवाड,** आरपीआय जिल्हाध्यक्ष

**पनवेल महानगरपालिका निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळेल आणि पुन्हा एकदा महायुतीची सत्ता येथे स्थापन**



**होईल. मागील निवडणुकीपेक्षा जास्त जागा आम्ही जिंकणार आहोत. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार यांचे सर्वसामान्य माणसाच्या विकासाचे सरकार आहे. महापालिकेत विकासाचे धोरण आणि विकासाचे तोरण या दृष्टिकोनातून महायुती सज्ज झाली असून १६ जानेवारीला महायुतीचा विजय मोठा असेल.**
**-महेश बालदी,** आमदार

**निवडणुकीत जागांपेक्षा विकासाला प्राधान्य देण्याचे काम केले आहे. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत भरघोस यश मिळाले. आता महापालिका जिंकायची आहे. वाटाघाटीच्या अनुषंगाने आम्ही समाधानी असून पुन्हा एकदा महापालिका जिंकण्यासाठी महायुती सज्ज झाली आहे.**
**-रामदास शेवाळे,** शिवसेना जिल्हाप्रमुख



## ठाण्यातही 'मविआ' फुटली!
### काँग्रेस मनपा निवडणूक स्वबळावर लढणार

**ठाणे : प्रतिनिधी**

राज्यात महानगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असताना राजकीय समीकरणेही वेगाने बदलत आहेत. जागावाटपावरून निर्माण झालेला पेच न सुटल्याने अखेर मुंबईपाठोपाठ ठाण्यातही महाविकास आघाडीत फूट पडली आहे. ठाणे शहर काँग्रेसचे अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी पत्रकार परिषद घेऊन पक्ष ठाण्यात स्वबळावर लढणार असल्याची माहिती दिली.

ठाणे महापालिका निवडणुकीसाठी गेल्या काही दिवसांपासून महाविकास आघाडीमध्ये जागावाटपाची चर्चा सुरू होती. काँग्रेसने ठाणे जिल्ह्यात सन्मानजनक जागांची मागणी केली होती, मात्र शिवसेना ठाकरे गट आणि मनसेने काँग्रेसला जास्त जागा देण्यास नकार दिला. वारंवार चर्चा करूनही जागावाटपाचा तिढा सुटत नसल्याने अखेर काँग्रेसने स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेतला आहे.

'हमे तो अपनो ने लुटा गैरोने नही' असे म्हणत काँग्रेस शहराध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी सांगितले की, आम्ही ३५ जागा मागितल्या होत्या, पण ते २० जागांदेखील द्यायला तयार नव्हते. मी माझी उमेदवारी सोडायला तयार झालो होतो. आम्ही तीन वेळा लेखी प्रस्ताव दिले होते, मात्र मनसेला एकेका प्रभागात दोन-दोन जागा आणि काँग्रेसला नाही. त्यामुळे आम्हाला स्वबळावर लढण्यास त्यांनी भाग पाडल. पुढे बोलताना त्यांनी अडचणीत असताना मी जितेंद्र आव्हाड आणि राजन विचारे यांना मदत केली, तेच आज आमच्या जीवावर उठलेत, असा संतापही व्यक्त केला.

कळवा आणि मुंब्रा येथे काँग्रेस आपले पूर्ण ताकदीनिशी उमेदवार उतरवणार असून येथे स्वबळावर लढणार आहे तसेच ठाण्यातील अन्य महत्त्वाच्या जागांवरही काँग्रेसचे उमेदवार अर्ज भरणार असल्याचे चव्हाण यांनी म्हटले.

## निवडक

### अरवली टेकड्यांच्या नव्या व्याख्येला 'सर्वोच्च' स्थगिती
**नवी दिल्ली :** अरवली पर्वतरांगांच्या नव्या व्याख्येवरून पर्यावरण तज्ज्ञ आणि सामाजिक संघटनांनी व्यक्त केलेल्या चिंतेची सर्वोच्च न्यायालयाने दखल घेतली असून अरवली टेकड्यांच्या नव्या व्याख्येला स्थगिती देण्याचा निर्णय सोमवारी (दि. २९) सर्वोच्च न्यायालयाने दिला. या सुनावणीत न्यायालयाने तज्ज्ञांचे एक नवीन पॅनेल स्थापन करण्याचे निर्देश दिले तसेच पुढील सुनावणीसाठी २१ जानेवारी ही तारीख दिली.

### धुक्यामुळे विमान उड्डाणे, रेल्वे वाहतुकीवर परिणाम
**नवी दिल्ली :** उत्तर भारतात धुक्यामुळे विमान उड्डाणे तसेच रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला आहे. दिल्लीला येणाऱ्या १८ रेल्वेगाड्या तीन तासांपेक्षा उशिराने धावत आहेत, अशी माहिती रेल्वेच्या दिल्ली विभागाने दिली, तर दिल्ली विमानतळावरुन नियोजित ६४ हवाई उड्डाणे रद्द झाली. प्रवाशांनी विमान कंपन्यांच्या अधिकृत संपर्क यंत्रणेवरून अद्ययावत माहिती घेऊन प्रवास करावा, अशी सूचना नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने केली आहे.

## माणसाने मातीची आणि संस्कृतीची जाण ठेवावी -लोकनेते रामशेठ ठाकूर
### गव्हाण कोळीवाडा सांस्कृतिक महोत्सव रंगला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माणूस कितीही मोठा झाला तरी ज्या मातीत आपण वाढलो, त्या मातीची आणि संस्कृतीची जाण असणे अत्यंत महत्त्वाचे असते, असे उद्गार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गव्हाण येथे आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या भव्य गव्हाण कोळीवाडा सांस्कृतिक महोत्सव २०२५च्या उद्घाटनावेळी केले.

गव्हाण ग्रामपंचायतीसमोरील मैदानात आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत रविवारी (दि. २८) रंगलेल्या या महोत्सवाचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांचा भव्य सत्कार करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते.

सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या या महोत्सवात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये गव्हाण





कोळीवाडा होड्यांसाठी असणाऱ्या एका वैशिष्ट्यपूर्ण बावटा प्रक्षेपणाचा कार्यक्रम या महोत्सवाचे मुख्य आकर्षण ठरले. वेसावकर आणि मंडळींचा प्रसिद्ध डान्स, गव्हाण कोळीवाडा प्रस्तुत विशेष नृत्य आणि स्टेप आर्ट डान्स ग्रुपने प्रेक्षकांची मने जिंकली. सुप्रसिद्ध गायक योगेश आग्रावकर, हितेश कडू आणि हृदया जाधव यांच्या गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. स्थानिक ब्रास बँड आणि बँजो बँडच्या सादरीकरणाने महोत्सवात रंगत आणली. सम्राट कोळी, आकाश कोळी आणि समस्त ग्रामस्थ मंडळ गव्हाण कोळीवाडा यांनी या भव्य महोत्सवाचे आयोजन केले होते.

या महोत्सवास भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, पांडुरंग म्हात्रे, भाऊशेठ पाटील, विश्वनाथ कोळी, निलेश खारकर, जयवंत देशमुख, हेमंत ठाकूर, वसंत म्हात्रे, आकाश कोळी, सम्राट कोळी, निकिता खारकर, भूषण भगत, योगिता भगत, सचिन देशमुख, विनायक कोळी, प्रमोद कोळी, पियुषा कोळी, सरगम कोळी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतिश पाटील यांनी केले.

### समाजाच्या उत्थानासाठी सदैव तत्पर -आमदार महेश बालदी
या कार्यक्रमात आमदार महेश बालदी यांनी कोळी समाजाच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची ग्वाही दिली तसेच आपल्या समाजाच्या सर्वांगीण उत्थानासाठी जे जे आवश्यक आहे, ते सर्व करण्यासाठी मी सदैव तत्पर असेन, असा शब्द दिला.

## शिवसेना नेते किशोर जैन यांचा समर्थकांसह राजीनामा



**नागोठणे : प्रतिनिधी**

शिवसेना उबाठा गटाचे रायगड जिल्हा सहसंपर्क प्रमुख किशोर जैन यांच्यासह नागोठणे विभाग प्रमुख संजय भोसले, उपतालुकाप्रमुख गणपत म्हात्रे, नागोठणे शाखाप्रमुख धनंजय जगताप यांनी आपल्या पदाचा व प्राथमिक पक्ष सदस्यत्वाचा तडकाफडकी राजीनामा दिल्याने नागोठण्यासह जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

जैन, भोसले, म्हात्रे आणि जगताप यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना दिलेल्या राजीनामापत्रात म्हटले आहे की, पक्षाचे धोरण व विचारधारेप्रति आमची निष्ठा सदैव राहिली आहे. पक्षाने आमच्यावर ठेवलेल्या विश्वासाबद्दल आम्ही मनपूर्वक आभारी आहोत, मात्र काही वैयक्तिक कारणामुळे आम्ही सध्या पक्षाच्या संघटनात्मक कार्यात अपेक्षित वेळ देऊ शकत नाही. म्हणून आम्ही आमच्या पदाचा स्वेच्छेने राजीनामा देत आहेत तसेच आमच्या प्राथमिक शिवसैनिक सदस्यत्वाचादेखील राजीनामा देत आहोत. आम्हाला पक्षाच्या विविध पदावर काम करण्याची संधी दिल्याबद्दल आम्ही ऋणी आहोत. कृपया आमचा हा राजीनामा मान्य करण्यात यावा ही नम्र विनंती, असेही त्यांनी राजीनामापत्रात नमूद केले आहे.

## थर्टीफर्स्टला बेकायदा दारू पार्ट्यांवर राहणार 'वॉच'

**अलिबाग : प्रतिनिधी**

सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर दारूची अवैध विक्री आणि वाहतूक रोखण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने कंबर कसली आहे. त्यासाठी विशेष भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. विनापरवाना पार्ट्यांचे आयोजन केल्यास कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे तसेच वाहनांची तपासणी करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.

थर्टीफर्स्ट आणि नववर्ष स्वागतासाठी अनेकदा बेकायदा, छुप्या पद्धतीने पार्ट्या आयोजित केल्या जातात. अशा पार्ट्यांवर राज्य उत्पादन शुल्क विभागाची नजर राहणार आहे. त्याचप्रमाणे हातभट्टीच्या दारूची विक्री रोखण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

उत्पादन शुल्क विभागामार्फत जिल्ह्यात पाच कार्यकारी निरीक्षक आणि दोन भरारी निरीक्षक पथके कार्यरत करण्यात येणार आहे. जिल्ह्यात मद्यविक्रीमध्ये परराज्यातील मद्य विक्री होणार नाही याबाबत खबरदारी घेण्यात येणार आहे. नववर्ष स्वागतासाठी विनापरवाना पार्ट्यांचे आयोजन करणाऱ्यांवर

### उत्पादन शुल्क विभागाकडून भरारी पथकांची स्थापना



कारवाई केली जाईल.

दारू पार्टीसाठी परवानगी असणे आवश्यक आहे. एकदिवसीय परवाना न घेता विनापरवाना मद्यविक्री होत असल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करणार असल्याचे संकेत राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक रविकिरण कोले यांनी दिले आहेत. कारवाई टाळण्यासाठी एकदिवसीय परवाना घेऊनच आयोजन करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. ज्या हॉटेल आस्थापनांमध्ये बँक्वेट हॉल, सोसायटी, क्लब हाऊस, मैदाने या ठिकाणी नववर्षाच्या अनुषंगाने पार्टीचे आयोजन करण्यात येणार असेल त्यांनीही एकदिवसीय परवाना घ्यावा. विनापरवाना पार्टीचे आयोजन केल्यास आयोजक व जागा मालकावर कारवाई करण्यात येणार आहे.

### परवाना बंधनकारक!
हॉटेल, बँक्वेट हॉल, सोसायटी, क्लब हाऊस, मैदाने या ठिकाणी दारू पार्टीचे आयोजन करण्यात येणार असेल, तर एकदिवसीय परवाना घेण्यात यावा. विनापरवाना पार्टीचे आयोजन केल्यास आयोजक व जागा मालकावर कारवाई करण्यात येणार आहे. पार्टीच्या ठिकाणी राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत एकदिवसीय परवाना वितरित करण्यात येतो. हे परवाने शासनाच्या https//aaplesarkar.mahaonline.gov.in/ या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने वितरित करण्यात येतात, असे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक रविकिरण कोले यांनी म्हटले आहे.

## विद्युत तारेचा शॉक लागून कर्जतमध्ये शेतकऱ्याचा मृत्यू

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील विद्युत महावितरण कंपनीच्या निष्काळजी कारभारामुळे पुन्हा एकदा एका निष्पाप शेतकऱ्याचा जीव गेला आहे. कडावजवळील कुंडलज येथील बबन चंचे (वय ६०) यांचा शेतात काम करत असताना तुटलेल्या विद्युत वाहक तारेला शॉक लागून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना सायंकाळी साडेपाचच्या सुमारास घडली.

बबन चंचे हे आपल्या शेतातील मळ्यावर नेहमीप्रमाणे काम करत होते. याचदरम्यान शेतालगतच्या नाल्यात वाहणाऱ्या पाण्यात महावितरण कंपनीची जिवंत विद्युत वाहक तार तुटून पडलेली होती. नाल्यातील पाणी काढत असताना चंचे यांना अचानक तीव्र विद्युत शॉक बसला. गंभीर अवस्थेत त्यांना तत्काळ कर्जत उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र तपासणीअंती डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

या घटनेनंतर परिसरात संतापाची लाट उसळली असून चंचे यांच्या मृत्यूस विद्युत महावितरण कंपनी जबाबदार असल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे. विशेष म्हणजे कर्जत तालुक्यात याआधीही विद्युत महावितरणच्या हलगर्जीपणामुळे अनेक जणांना आपला जीव गमवावा लागल्याच्या घटना घडल्या आहेत.

महावितरणच्या ढिसाळ कारभारामुळे अजून किती जीव जाणार, असा सवाल लोक विचारत आहेत.

मुंबई महापालिकेची रणधुमाळी

# भाजपकडून माजी नगरसेवकांसह काही नव्या चेहऱ्यांनाही संधी

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महापालिका निवडणुकीसाठी भाजपने आपल्या कोणत्या कार्यकर्त्यांना उमेदवारी दिली याची नावे समोर आली आहे. या पहिल्या यादीत ६६ जणांचा समावेश आहे. माजी नगरसेवकांसह काही नव्या चेहऱ्यांनादेखील यामध्ये संधी देण्यात आली आहे.

भाजप आणि शिवसेना शिंदे गट युतीमध्ये ज्या जागांवर एकमत झाले आहे, त्या जागांवरील उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. भाजपनेही यादी जाहीर केली नाही, पण दादर येथील भाजपच्या कार्यालयातून रविवारी रात्रीपासून एबी फॉर्मचे वाटप करण्यात आले. शिक्कामोर्तब करण्यात आलेल्या उमेदवारांना फोन करून कार्यालयात बोलावण्यात आले आणि एबी फॉर्म देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

भाजपच्या पहिल्या यादीत तेजस्वी घोसाळकर, गणेश खणकर, मनिषा यादव, मिलिंद शिंदे, नवनाथ बन, आकाश पुरोहित यांच्यासह अनेक नावांचा समावेश आहे. काँग्रेसमधून भाजपत आलेल्या रवी राजा यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. धारावीतील वॉर्ड क्रमांक १८५मधून राजा निवडणूक लढवणार आहेत. ते मुंबई महापालिकेतील माजी विरोधी पक्षनेते होते. काँग्रेसला सोडचिठ्ठी देत भाजपत प्रवेश केला होता.

अभिनेत्री निशा परूळेकर हिनेही भाजपकडून मुंबई महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. कांदिवली पूर्व प्रभाग क्रमांक २५मधून निशाला उमेदवारी देण्यात आली आहे. गेल्या काही काळापासून ती राजकारणात सक्रिय असून सध्या भाजप सांस्कृतिक प्रकोष्ठच्या सहसंयोजक म्हणून कार्यरत आहे.

दरम्यान, मुंबई महापालिका निवडणुकीसाठी काँग्रेसने वंचित बहुजन आघाडीसोबत युती केल्यानंतर पहिली उमेदवारी यादी जाहीर केली आहे. या यादीत ८७ जणांना स्थान देण्यात आले आहे. ज्या जागांवर तिढा नाही, अशा जागांवरील उमेदवार काँग्रेस पक्षाने जाहीर केले आहेत.

दुसरीकडे मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी राजकीय वातावरण तापू लागले आहे असून राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाने आपल्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. या यादीत सात प्रमुख वॉर्डांमधील उमेदवारांच्या नावांची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे मुंबई विभागीय निवडणूक प्रभारी अध्यक्ष मिलिंद कांबळे आणि सहअध्यक्ष सोहेल सुभेदार यांच्या अधिकृत मान्यतेने उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. जाहीर केलेल्या सात उमेदवारांपैकी चार जागांवर महिला उमेदवारांना संधी देण्यात आली आहे. सर्वसाधारण गटासोबतच अनुसूचित जाती आणि ओबीसी प्रवर्गातील उमेदवारांनाही स्थान देण्यात आले. या यादीमुळे आता मुंबई महापालिकेच्या मैदानात शरद पवार गटाने आपले मोहरे उतरवण्यास सुरुवात केल्याचे स्पष्ट झाले आहे.



**खोपोली : शिवसेनेचे मंगेश काळोखे हत्येप्रकरणी आमदार महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी कॅण्डल मार्च काढण्यात आला होता. साईबाबा नगर येथील काळोखे यांच्या निवासस्थानाकडून पोलीस ठाण्यावर हजारोंच्या उपस्थितीत भव्य कॅण्डल मार्च निघाला. या वेळी उपविभागीय अधिकारी नेहुल यांना आमदार महेंद्र थोरवे व शिवसेना शिष्टमंडळाने निवेदन देऊन उर्वरित आरोपींना लवकरात लवकर पकडून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली. जर वेळीच कारवाई झाली नाही, तर याहूनही तीव्र स्वरूपाचे आंदोलन शिवसेनेच्या वतीने करण्यात येईल, असा इशारा या वेळी त्यांनी दिला.**

## अलिबागेत भाजप, शिवसेना नगरसेवकांनी पदभार स्वीकारला

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग नगर परिषदेच्या निवडणुकीत निवडून आलेले भाजपाचे नवनिर्वाचित नगरसेवक ॲड. अंकित बंगेरा तसेच शिवसेना ठाकरे गटाचे नगरसेवक श्वेता पालकर आणि संदीप पालकर या पती-पत्नीने सोमवारी (दि. २९) नगरसेवक पदाचा कार्यभार स्वीकारला.

अलिबाग नगर परिषदेची निवडणूक २ डिसेंबर रोजी पार पडली होती. त्यानंतर २१ डिसेंबर रोजी निकाल जाहीर झाले. शेकापचे १७ तर विरोधकांचे ३ नगरसेवक निवडून आले. शिवसेना ठाकरे २ तर भाजपचा १ नगरसेवक विजयी झाला. या तिन्ही निवडून आलेल्या नगरसेवकांनी



सोमवारी अलिबाग नगरपालिकेत नगरसेवक पदाचा पदभार स्वीकारला. या वेळी दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## कराडेजवळ अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या अतिरिक्त पाताळगंगा एमआयडीसी हद्दीत सोमवारी (दि.२९) दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास दोन दुचाकीस्वारांचा अपघात झाल्याची घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार पाताळगंगा रसायनी हद्दीतील रेन्युसिस कंपनी जवळ दोन दुचाकीस्वारांचा समोरासमोर येऊन अपघात झाला. सिद्धेश्वरी



कॉर्नरकडून कासपच्या दिशेने जात असताना (एमएच ४६ डिबी ८३३७) या दुचाकी वाहनाची समोरील येणाऱ्या वाहन (एमएच-०६ बीबी ०९६८ या वाहनाला जोरात धडक बसली. ही धडक इतकी जोरात होती की, यामध्ये (एमएच-०६ बीबी ०९६८) क्रमांकच्या दुचाकीस्वाराला पायाला किरकोळ दुखापत झाली. तर (एमएच ४६ डिबी ८३३७) वरील वाहन चालक संतोष रामा लेंडे (२१ वय, रा. माडभुवन, सारसई) याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याची माहिती मिळाली.

घटनेची माहिती मिळताच रसायनी पोलीस कर्मचारी घटनास्थळी पोहोचले आणि वाहतूक कोंडी दूर करून मयत संतोष लेंढे यास चौक येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. या वेळी डॉक्टरांनी मयत झाल्याचे घोषित केले.


## नवी मुंबई भाजपमध्ये इनकमिंग सुरूच





**नवी मुंबई :** महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत उमेदवारी अर्ज भरण्याचा अखेरचा टप्पा आल्यानंतर निष्ठावंत शिवसैनिक म्हणून ओळखले जाणारे शिवसेनेचे माजी उपनेते विठ्ठल मोरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाच्या महिला जिल्हाध्यक्ष सलूजा सुतार यांनी समर्थकांसह वनमंत्री गणेश नाईक, भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या उपस्थितीत प्रवेश केला आहे. घणसोली येथील शिंदे गटाचे कार्यकर्ते प्रमोद पाटील यांनीही भाजपचा झेंडा हाती घेतला आहे.

## हेटवणे जलवर्धन योजनेतील बोगदा खोदण्याचे काम पूर्ण



**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

हेटवणे पाणी पुरवठा योजनेतील अत्यंत प्रतिकूल अशा भूगर्भशास्त्र आणि अभियांत्रिक विषयक आव्हानांवर मात करून सिडकोने सोमवारी (दि.२९) पहिल्यांदाच बोगदा खोदण्याच्या कामासंदर्भात अद्वितीय कामगिरी करून इतिहास रचला. सिडकोच्या आजवरच्या प्रकल्पांपैकी बोगदा खोदण्याच्या कामासंर्भात पहिल्यांदाच अशाप्रकारे ऐतिहासिक कामगिरी करण्यात आली आहे.

या कामगिरीचे यश साजरे करण्यातकरिता प्रकल्पस्थळी सिडको उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, मुख्य अभियंता (न.मु.आं.वि. व वि. प्र.) शीला करूणाकरन, अधीक्षक अभियंता (पाणी पुरवठा) प्रवीण सेवतकर यांसह सिडकोच्या पाणी पुरवठा विभागातील अधिकारी आणि फकॉन्समधील अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सातत्याने विकसित होत असलेल्या नवी मुंबईतील पाण्याची वाढती मागणी पूर्ण करण्याकरिता सिडकोतर्फे हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या अंतर्गत प्रक्रियारहित पाण्याकरिता १३.२५ किलोमीटरचा तर शुद्ध पाण्याकरिता १५.४ किलोमीटरचा बोगदा उभारण्यात येणार आहे. सदर काम पूर्ण झाल्यानंतर सिडकोला सध्याच्या १५० एमएलडी ऐवजी २७० एमएलडीचा वाढीव पाणी पुरवठा उपलब्ध होणार आहे.

> **हेटवणे जलवर्धन योजनेतील जलबोगद्याचे काम ही सर्वांत आव्हात्मक कामगिरी आहे. उर्वरित बोगदा खोदण्याचे काम देखील नियोजित वेळेत पूर्ण करण्यात येणार आहे. यामुळे सिडकोच्या पाणी साठ्यामध्ये वाढ होऊन नवी मुंबईला वाढीव पाणी पुरवठा करण्याकरिता मदत होणार आहे.**
>
> -विजय सिंघल, उपाध्यक्ष, सिडको

सिडकोच्या जलबोगदा पॅकेज-१ अंतर्गत वहाळ गावातील शाफ्ट-४ येथे ही ऐतिहासिक कामगिरी पार पाडण्यात आली. अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चरतर्फे पॅकेज-१ ची अंमलबजावणी करण्यात येत असून यामध्ये शुद्ध पाण्यासाठी ८.७ किलोमीटर लांबीचा बोगदा खोदण्यात येणार असून त्यापैकी ५.५२ किलोमीटर बोगदा खोदण्याचे काम आतापर्यंत पूर्ण झाले आहे.

## नवी मुंबई विमानतळावरून प्रवासासाठी टॅक्सी, रिक्षाचे नवे भाडेदर जाहीर

**रायगड : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी प्रिपेड टॅक्सी सेवेसाठी नवे भाडेदर निश्चित करण्यात आले आहेत. सुधारित मूलभूत टॅक्सी भाडे दर २०.६६ रुपये प्रति किलोमीटर गृहीत धरून अंतरानुसार भाडे व प्रोत्साहन टक्केवारी निश्चित करण्यात आली आहे.

निश्चित करण्यात आलेल्या दरांनुसार ६ किलोमीटरपर्यंतच्या प्रवासासाठी २५ टक्के प्रोत्साहनासह एकूण भाडे रु. १५५ आकारले जाणार आहे. ६.१ ते ८ किलोमीटर अंतरासाठी भाडे २०७ रुपये तर ८.१ ते १० किलोमीटरसाठी २५८ रुपये इतके भाडे निश्चित करण्यात आले आहे. १०.१ ते १२ किलोमीटरसाठी ३१० आणि १२.१ ते १४ किलोमीटर अंतरासाठी २० टक्के प्रोत्साहनासह ३४७ रुपये भाडे आकारले जाणार आहे. १४.१ ते १६ किलोमीटरसाठी ३९७, १६.१ ते १८ किलोमीटरसाठी ४४६, तर १८.१ ते २० किलोमीटरसाठी ४९६ रुपये भाडे निश्चित करण्यात आले आहे. पुढे २०.१ ते २२ किलोमीटरसाठी ५४५ आणि २२.१ ते २४ किलोमीटर अंतरासाठी ५९५ रुपये इतके भाडे राहील. २४.१ ते २६ किलोमीटर अंतरासाठी १५ टक्के प्रोत्साहनासह ६१८, २६.१ ते २८ किलोमीटरसाठी ६६५, तर २८.१ ते ३० किलोमीटरसाठी ७१३ रुपये भाडे निश्चित करण्यात आले आहे. ३०.१ ते ३२ किलोमीटरसाठी ७६०, ३२.१ ते ३४ किलोमीटरसाठी ८०९, ३४.१ ते ३६ किलोमीटरसाठी ८५५ आणि ३६.१ ते ३८ किलोमीटरसाठी९०२ रुपये इतके भाडे राहील. ३८.१ ते ४० किलोमीटरसाठी ९५०, तर ४०.१ ते ४२ किलोमीटर अंतरासाठी ९९८ रुपये भाडे आकारले जाणार आहे.

४२.१ किलोमीटरपेक्षा पुढील अंतरासाठी दर २ किलोमीटरच्या स्लॅबनुसार भाडे आकारले जाणार असून, आकारणी ही (चार्जेबल अंतर ÷ २०.६६ रुपये) त्यावर लागू प्रोत्साहन टक्केवारीनुसार करण्यात येणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी प्रिपेड ऑटोरिक्षा सेवेसाठी नवे भाडेदर निश्चित करण्यात आले आहेत. सुधारित मूलभूत ऑटोरिक्षा भाडे दर १७.१४ रुपये प्रति किलोमीटर गृहीत धरून अंतरानुसार भाडे व प्रोत्साहन टक्केवारी ठरविण्यात आली आहे. निश्चित दरांनुसार ६ किलोमीटरपर्यंतच्या प्रवासासाठी २५ टक्के प्रोत्साहनासह एकूण भाडे १२९ आकारले जाणार आहे. ६.१ ते ८ किलोमीटर अंतरासाठी १७१, तर ८.१ ते १० किलोमीटरसाठी २१४ रुपये इतके भाडे निश्चित करण्यात आले आहे. १०.१ ते १२ किलोमीटरसाठी २५७ आणि १२.१ ते १४ किलोमीटर अंतरासाठी २० टक्के प्रोत्साहनासह २८८ रुपये भाडे आकारले जाणार आहे.

१४.१ ते १६ किलोमीटरसाठी ३२९, १६.१ ते १८ किलोमीटरसाठी ३७०, तर १८.१ ते २० किलोमीटरसाठी ४११ रुपये भाडे निश्चित करण्यात आले आहे. २०.१ ते २२ किलोमीटरसाठी ४५२ आणि २२.१ ते २४ किलोमीटर अंतरासाठी ४९३ रुपये इतके भाडे राहील.

२४.१ ते २६ किलोमीटर अंतरासाठी १५ टक्के प्रोत्साहनासह ५१२, २६.१ ते २८ किलोमीटरसाठी ५५२, तर २८.१ ते ३० किलोमीटरसाठी ५९१ भाडे निश्चित करण्यात आले आहे. ३०.१ ते ३२ किलोमीटरसाठी ६३१, ३२.१ ते ३४ किलोमीटरसाठी ६७०, ३४.१ ते ३६ किलोमीटरसाठी ७१० आणि ३६.१ ते ३८ किलोमीटरसाठी ७४९ इतके भाडे आकारले जाणार आहे. ३८.१ ते ४० किलोमीटरसाठी ७८८, तर ४०.१ ते ४२ किलोमीटर अंतरासाठी ८२८ रुपये भाडे निश्चित करण्यात आले आहे.

४२.१ किलोमीटरपेक्षा पुढील अंतरासाठी दर २ किलोमीटरच्या स्लॅबनुसार भाडे आकारले जाणार असून, आकारणी ही (चार्जेबल अंतर ÷ १७.१४ रुपये) त्यावर लागू प्रोत्साहन टक्केवारीनुसार करण्यात येणार आहे.

## पिरकोन ग्रामपंचायत निधीतून रस्ता साकार



**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील पिरकोन ग्रामपंचायतमध्ये ग्रामपंचायत निधीतून दोन लाख ९० हजार हा निधी खालच्या आलीच्या रस्त्यासाठी वापरण्यात आला. बरीच वर्ष रखडलेला हा रस्ता झाल्यानंतर तेथील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

पिरकोन गावातील थेट सरपंच कलावती पाटील, माजी सरपंच के. वाय. गावंड, तसेच ग्रामपंचायत सदस्य राजश्री म्हात्रे, दीपक पाटील, प्रियंका पाटील, अंकित पाटील आणि सर्व ग्रामपंचायत सदस्य यांच्या प्रयत्नाने हा रस्ता पूर्ण झाला. या वेळी भाजप उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, माजी जि प सदस्य जीवन गावंड, कॉन्ट्रॅक्टर विशाल गावंड, गुड्डू शर्मा, विठ्ठल गावंड, रमण गावंड, राकेश गावंड, सुजीत गावंड, परशुराम गावंड आदी उपस्थित होते.

पान १ वरुन

### पनवेल मनपा निवडणुकीसाठी महायुतीची घोषणा

भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शिवसेनेचे महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, आरपीआयचे महानगर अध्यक्ष प्रभाकर कांबळे, भाजपचे माजी शहराध्यक्ष अनिल भगत, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू आदी उपस्थित होते.

या वेळी महायुतीची घोषणा करताना पनवेल शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महायुती कटिबद्ध असून आतापर्यंत राबविण्यात आलेल्या विकासकामांच्या जोरावर पुन्हा एकदा जनतेचा भक्कम पाठिंबा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. पनवेल महापालिकेत स्थिर व सक्षम प्रशासन देण्यासाठी महायुती एकत्र आली असून विकासाच्या मुद्द्यावर कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असे नेत्यांनी स्पष्ट केले. शहरातील प्रत्येक प्रभागाचा समतोल विकास, सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडवणे आणि पारदर्शक कारभार हे महायुतीचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचेही सांगण्यात आले. त्याचबरोबर मंगळवारी (दि. ३०) महायुतीच्या सर्व उमेदवारांचे अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल करण्यात येणार असल्याचेही नमूद करण्यात आले.

## विकास गोगावलेंच्या तडीपारीची मागणी

### महाडमधील शिष्टमंडळाचे पोलीस अधीक्षकांना निवेदन



**अलिबाग : प्रतिनिधी**

आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मंत्री भरत गोगावले यांचा मुलगा विकास गोगावले यांना तडीपार करण्याची मागणी महाडमधील लोकप्रतिनिधींनी केली. रायगडच्या पोलीस अधीक्षक यांना त्यांनी याबाबतचे निवेदन सोमवारी दिले. पोलीस अधीक्षकांनी आठ दिवसांत यासंदर्भात कारवाई न केल्यास उच्च न्यायालयात जाण्याचा इशारा या वेळी देण्यात आला.

या शिष्टमडळात प्रामुख्याने राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांचा समावेश होता. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा संघटक चंद्रकांत जाधव, शिवसेना उपजिल्हा समन्वयक सोमनाथ ओझर्डे, राष्ट्रवादी विधानसभा अध्यक्ष राजेंद्र कोर्पे, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष निकम, सभापती श्रीधर सकपाळ नगरसेवक संदीप जाधव, नगरसेवक महेश शेडगे, नगरसेविका गीतांजली महाडीक, अक्षया हेलेकर, दिक्षा शिंदे, खरवली सरपंच चैतन्य महामुणकर, शैलेश देशमुख, रेहान देशमुख, साहिल हेलेकर, रोहित पोरे, पांडुरंग निवाते यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाड नगरपालिका निवडणुकीत मतदानाच्या दिवशी विकास गोगावले यांच्याकडून सुशांत जाबरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना मारहाण करण्यात आली. ज्यामुळे मतदारांमध्ये दहशत निर्माण झाली होती. या प्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तेव्हा पासून ते फरार आहेत. विकास गोगावले यांच्यावर यापुर्वी अन्य तीन गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांची नोंद विविध पोलीस ठाण्यात आहे. ज्यात महाड शहर पोलीस ठाण्यातील मधील दोन तर गोरेगाव पोलीस ठाण्यात एका गुन्ह्याचा समावेश आहे. या चार गुन्ह्यांची दखल घेऊन त्यांना तडीपार करण्याची मागणी या शिष्टमंडळाकडून करण्यात आली.

### दुखवटा

**काकासाहेब माने**



**नागोठणे :** नागोठणे ग्रामपंचायतीचे माजी सदस्य नाभिक समाजाचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सदानंद धोंडू उर्फ काकासाहेब माने (वय ८९) यांचे सोमवारी (दि.२९) निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन पुत्र, दोन कन्या, सुना पल्लवी, नातू, तसेच पतवंडे, पुतणे असा मोठा परिवार आहे. कै. काकासाहेब माने यांचा दशक्रिया विधी बुधवारी (दि.७ जानेवारी) हरेहरेश्वर येथे व उत्तरकार्य शुक्रवारी (दि.९ जानेवारी) नागोठणे येथील राहत्या घरी होणार असल्याची माहिती माने कुटुंबियांकडून देण्यात आली आहे.

# थर्टीफर्स्टच्या पार्ट्यांवर प्रशासनाची नजर

## अनुचित प्रकारांवर होणार कारवाई



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नववर्षाच्या स्वागतासाठी ३१ डिसेंबरच्या रात्री जागोजागी पार्ट्या होतात. मद्यप्राशन करून वाहन चालविणे, मारामारीचेही प्रकार या वेळी घडतात. त्यातच निवडणुकांचा हंगाम सुरू असल्याने पोलीस प्रशासनाची चिंता वाढली आहे. थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर पनवेल परिसरात अनुचित प्रकार घडू नये म्हणून प्रशासनाचीदेखील तयारी सुरू आहे. थर्टी फर्स्टच्या दिवशी धिंगाणा घातला तर प्रशासनाकडून कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे मद्यप्राशन करून वाहन चालवू नका आणि कारवाईचे संकट स्वतःहून ओढवू नका, असे आवाहन केले जात आहे.

मद्य प्राशन करून वाहन चालवल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे. ब्रेथ मशीनद्वारे वाहन चालकाची तपासणी करून कारवाई होणार आहे. पनवेल महानगरपालिकेची निवडणूक सुरू असल्याने यंदाची थर्टी फर्स्ट जंगी होणार आहे. पनवेल तालुक्यात अनेक फार्म हाऊस आहेत. या फार्म हाऊसचे यापूर्वीच बुकिंग झालेली आहे. थर्टी फर्स्टच्या दिवशी अनेक जण फार्म हाऊसमध्ये जाऊन मौजमजा करतात. आणि नववर्षाचे स्वागत करतात. पनवेल तालुका पोलिसांद्वारे खारपाडा, कोन, नेरे येथे नाकाबंदी असणार आहे. तर पनवेल वाहतूक शाखेतर्फे आदई सर्कल, ठाणा नाका गार्डन हॉटेल सिग्नल, शिवशंभो नाका पनवेल, वडघर नाका, उरण नाका ब्रिज या ठिकाणी नाकाबंदी करण्यात येणार आहे.

पनवेल तालुका पोलिसांतर्फे २ पीआय, ८ पीएसआय/एपीआय, ४८ पोलीस स्टाफ असे एकूण ५८ पोलीसांचा वॉच राहणार आहे तर पनवेल वाहतूक शाखेचे तीन ऑफिसर आणि २० स्टाफ यावेळी विविध ठिकाणी हजर राहणार आहेत. मद्यपींमुळे इतरांच्या जीवाला धोका असतो. मद्यप्राशन करून वाहन चालवल्याने अपघात होण्याची शक्यता असते तसेच वाहन दुसऱ्या वाहनाला धडकून मोठा अपघात होऊ शकतो आणि इतरांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. मद्य प्राशन करून वाहन चालवल्यास दहा हजार रुपयाचा दंड आहे. त्यामुळे वाहन चालवताना मद्यप्राशन करून वाहन चालवू नका, असे आवाहन करण्यात येत आहे.

# गोमांस विक्रीप्रकरणी फरार आरोपी पोलिसांच्या ताब्यात



**पनवेल : वार्ताहर**

बेकायदेशीररीत्या गोमांसाची वाहतूक करणाऱ्या वाहनासह पनवेल शहर पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेतले होते. या वेळी गाडीचा चालक सराईत गुन्हेगार फरार झाला होता. त्याला अँटॉप हिल येथून पनवेल शहर पोलिसांच्या विशेष पथकाने ताब्यात घेतले आहे. त्यामुळे आरोपींची संख्या तीन झाली आहे.

या गुन्ह्यामध्ये मोनिउद्दीन शेख (रा. शिवाजीनगर, गोवंडी), पासू उस्मान कुरेशी (रा. मानखुर्द) हे दोन आरोपी पूर्वीच पकडण्यात आले होते तर फरार गाडी चालक आरोपी मोहम्मद अली अकबर अली शहा (रा. अँटॉप हिल, मुंबई) याला वपोनी नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकातील तुषार बोरसे, मिथुन भोसले, संदेश म्हात्रे व शशिकांत काकडे यांनी कोणतीही तांत्रिक मदत नसताना तसेच कोणतीही पूर्व माहिती उपलब्ध नसतानाही, गोपनीय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार कौशल्यपूर्ण तपास करून अँटॉप हिल येथून ताब्यात घेतले आहे.

आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्या विरोधात मुंबई येथील विविध पोलिस ठाण्यात विविध गुन्हे दाखल आहे. त्याच्या विरोधात पनवेल शहर पोलिसांनी कलम ३२५, ३(५) सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये कारवाई केली आहे.

दरम्यान, परिसरात गुन्हेगारीला प्रवृत्तीच्या नागरिकांमुळे सामाजिक वातावरण दुषित होत आहे.

# पनवेलमध्ये प्रशासनाने शोधून काढले ११,४६० दुबार मतदार

**पनवेल : वार्ताहर**

आगामी पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीतील घोळांवर अखेर पडदा पडू लागला आहे. प्रारूप मतदार यादीमध्ये २१,१६२ मतदार दुबार व बोगस असल्याच्या हरकती महापालिकेकडे प्राप्त झाल्या, याची महापालिकेने सखोल छाननी केल्यानंतर तब्बल ११,४६० दुबार मतदार आढळून आले असून, या मतदारांकडून हमीपत्र घेण्यासाठी निवडणूक विभागाने प्रत्यक्ष क्षेत्रीय मोहीम हाती घेतली आहे. पुढील काही दिवसांत निवडणूक विभागाचे कर्मचारी घरोघरी भेटी देऊन संबंधित मतदारांकडून एका मतदान केंद्राची निवड निश्चित करून घेणार आहेत.


पनवेल महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक १५ जानेवारी रोजी होत असून, १ जुलै २०२५ रोजीची मतदार यादी ग्राह्य धरण्यात आली आहे. महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या ५,५४,५७८ मतदारांच्या प्रारूप यादीवर २९,४०६ हरकती दाखल झाल्या होत्या. यामध्ये स्वता मतदारांनी नोंदविलेल्या ५,५२६ तर इतरांनी नोंदविलेल्या १२,८५२ हरकतींचा समावेश होता. दुबार व संशयास्पद मतदारांबाबत एकूण २१,१६२ हरकती प्राप्त झाल्या तसेच ९४५ मृत मतदारांची नावे यादीत असल्याचाही दावा करण्यात आला होता. या हरकतीनंतर निवडणूक विभागाने सॉफ्टवेअर प्रणालीच्या मदतीने छायाचित्रांची तुलना, नावे, पालकांची माहिती आणि पत्ता यांची पडताळणी केली. ही प्रक्रिया १९ पर्यवेक्षकांच्या देखरेखीखाली राबविण्यात आली. तपासणीनंतर ११,४६० मतदार दुबार असल्याचे स्पष्ट झाले.

या मतदारांना दोनपैकी कोणत्या एका मतदान केंद्रावर मतदान करायचे आहे, याबाबत विकल्प स्वरूपाचे हमीपत्र भरून घेतले जाणार आहे.जे मतदार त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर सापडणार नाहीत किंवा माहिती देणार नाहीत, त्यांच्याकडून मतदानाच्या दिवशीच मतदान केंद्रावर हमीपत्र घेतले जाईल. प्रभागनिहाय बीएलओ पथकांच्या माध्यमातून प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे. हमीपत्र दिल्यानंतरही एखाद्या मतदाराने दोन ठिकाणी मतदान केल्याचे आढळल्यास त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल, असा इशारा निवडणूक विभागाचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी दिला आहे.

दरम्यान, दुबार व संशयास्पद मतदारांच्या मुद्द्यावर विविध राजकीय पक्षांनी आक्षेप घेतला होता. काही प्रभागांत मोठ्या प्रमाणात हरकती नोंदविल्या गेल्याने हा विषय चर्चेत आला होता. दोषमुक्त अंतिम मतदार यादीच्या आधारेच निवडणूक कार्यक्रम राबवावा, अशी मागणी या राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी केली होती. प्रशासनाने कार्यवाही केली आहे.

पनवेल महापालिका निवडणूक

# माध्यम संनियंत्रण कक्षाची पालिका आयुक्तांकडून पाहणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या माध्यम संनियत्रण कक्षाने अत्यंत दक्षतेने व काटेकोरपणे काम करावे. ज्यायोगे निवडणूक कामात अधिक पारदर्शकता येईल, असे निर्देश निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांनी दिले.

या वेळी त्याच्यासमवेत आचारसंहिता कक्ष प्रमुख तथा अतिरीक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे, उपायुक्त डॉ.वैभव विधाते, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, जनसंपर्क अधिकारी नितीन साके उपस्थित होते.

माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती गठित पनवेल महापालिकेकडून माध्यम संनियत्रणासाठी माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती गठित करण्यात आली आहे. यामध्ये निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे हे अध्यक्ष असून परिमंडळ-३ चे पोलीस उपायुक्त प्रशांत माहिते, आचारसंहिता कक्ष प्रमुख तथा अतिरीक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे, उपायुक्त प्रसेनजित कार्लेकर, जनसंपर्क अधिकारी नितीन साके सदस्य आहेत. मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर यांची सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या कक्षामार्फत प्रसारमाध्यम संनियंत्रण करण्यात येणार आहे. निवडणूकीमध्ये कोणत्याही राजकीय पक्षास अथवा उमेदवारास दूरदर्शन, उपग्रह वाहिन्या, केबल वाहिन्या, यू ट्युब वाहिन्या, केबल नेटवर्क, आकाशवाणी, खासगी एफ.एम. वाहिन्या, सिनेमागृह, सार्वजनिक ठिकाणचे ऑडिओ - व्हिज्युअल डिस्प्ले, ई-वृत्तपत्रे, बल्क एसएमएस, व्हॉईस एसएमएस, समाजमाध्यमे, संकेतस्थळे अशा कोणत्याही प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे जाहीरात प्रसारित किंवा प्रसिध्द करावयाची असल्यास त्या प्रस्तावित जाहिरातींचे समितीकडून 'पूर्वप्रमाणन' म्हणजे 'प्रसिध्दी अथवा प्रसारणापूर्वी मान्यता घेणे' आवश्यक आहे. पूर्वप्रमाणन केले नसल्यास त्या जाहिरातीचे प्रसारण किंवा प्रसिध्दी करता येणार नाही याची नोंद घ्यावयाची आहे.

# रामशेठ ठाकूर विद्यालयात सायबर सुरक्षेवर मार्गदर्शन शिबिर



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय येथे इयत्ता ११ वी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर एक माहितीपूर्ण मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले.

डिजिटल युगात इंटरनेटचा वाढता वापर आणि त्यासोबत उद्भवणारे सायबर धोके याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता. या शिबिरात अम्रिता सेनगुप्ता ३६ स्किलचे संचालक यांनी सायबर गुन्हे, ऑनलाईन फसवणूक, हॅकिंग, फिशिंग, ओटीपी व पासवर्ड सुरक्षितता, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर तसेच वैयक्तिक माहितीचे संरक्षण याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून सायबर हल्ले कसे होतात आणि त्यापासून कसे सावध राहावे, याबाबत विद्यार्थ्यांना उपयुक्त माहिती दिली.

विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारुन संवाद साधला. सायबर सुरक्षेचे महत्त्व लक्षात घेवून अशा प्रकारची शिबिरे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व वैयक्तिक आयुष्यासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे मत उपस्थित शिक्षकांनी व्यक्त केले. हे शिबिर विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरले असून डिजिटल सुरक्षिततेबाबत जागरुकता निर्माण करण्यात नक्कीच उपयोगी ठरेल. शिबिरास प्राचार्या निशा नायर यांचे मार्गदर्शन लाभले.

# दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांचे शुभचिंतन




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या एमएनएम विद्यालयात बोर्डाच्या फेब्रुवारी २०२६ करिता प्रविष्ट होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांचा शुभेच्छा चिंतन कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेचे चेअरमन भार्गव ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

शाळेचे चेअरमन भार्गव ठाकूर यांनी परीक्षेला सामोरे जाऊन उत्तुंग यश प्राप्त करा असे अधोरेखित करत बोर्ड परीक्षेकरिता शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे तसेच टीव्ही, मोबाईल आणि कॉम्प्युटर, तसेच इतर समाज माध्यमांपासून दूर राहावे आणि उत्तम यश संपादन करावे, असे आवाहन केले.

सूत्रसंचालन प्रांजल कोळी, समीक्षा बसरे या विद्यार्थिनींनी केले. दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी रॅम्प वॉक त्या आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. सहाय्यक शिक्षक राहुल म्हात्रे, स्वाती देशमुख यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाची तंत्रे सांगत निर्भीडपणे परीक्षेला सामोरे जाऊन उज्वल यश मिळवावे, असे नमूद केले.

पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, पर्यवेक्षक अरुण जोशी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कोमल पाटील, अस्मिता वाघमारे, संतोष पवार, जयश्री देशमुख यांनी मेहनत घेतली.

# निवडणुकीसाठी स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाची बैठक

**पनवेल : वार्ताहर**

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वॉर्ड क्रमांक १४, १८ आणि २० या ठिकाणच्या कार्यकर्त्यांची बैठक घेतली. त्यावेळी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर १ जानेवारीला शौर्य दिनानिमित्त भीमा कोरेगाव येथे जाण्याविषयी नियोजन करण्यात आले.

या वेळी पनवेल महानगर अध्यक्ष निलेश कांबळे, पनवेल शहर अध्यक्ष प्रशांत सोनवणे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते. महेश साळुंखे हे महाविकास आघाडीच्या व महायुतीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांबरोबर निवडणुकीत कोणाला पाठिंबा द्यायचा याविषयी चर्चा करीत आहेत. जो आम्हाला सन्मानपूर्वक वागणूक देईल त्याच गटाला आम्ही जाहीर पाठिंबा देऊ असे महेश साळुंखे यांनी जाहीर केलेले आहे आणि त्या दृष्टिकोनातून त्यांची वरिष्ठ पातळीवर चर्चा सुरू आहे. लवकरच ते आपला पाठिंबा कोणत्या गटाला आहे हे पत्रकार परिषद घेऊन जाहीर करणार आहेत.

# क्षयरोगाच्या लवकर निदानासाठी आयुष डॉक्टरांचे सीएमई प्रशिक्षण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्षयरोगाच्या निदानास गती मिळावी व संभाव्य रुग्णांची वेळेत ओळख करून उपचारासाठी संदर्भ दिला जावा या उद्देशाने आयुष डॉक्टरांसाठी आयोजित करण्यात आलेले एकदिवसीय वैद्यकीय (CME) प्रशिक्षण ग्लोबल फंडच्या सहाय्याने राबविण्यात येणाऱ्या SSHAKTI प्रकल्पाअंतर्गत हिंदुस्थान लेटेस्ट फॅमिली प्लॅनिंग प्रोमोशन ट्रस्ट (HLFPPT) यांच्यावतीने, राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम (NTEP) च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार व जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर यांच्या सूचनेनुसार हे प्रशिक्षण कार्यक्रम रविवारी (दि.२८) रोटरी क्लब हॉल, पनवेल येथे यशस्वीरीत्या झाले.

या प्रशिक्षणात एकूण ३१ आयुष डॉक्टरांनी सक्रिय सहभाग नोंदविला. प्रशिक्षण सत्रांमध्ये क्षयरोगाची मूलभूत माहिती, लवकर निदानाचे महत्त्व, रुग्ण संदर्भ प्रक्रिया, निक्षय (Ni-kshay) पोर्टलद्वारे क्षयरोग अधिसूचना तसेच NTEP अंतर्गत आयुष डॉक्टरांसाठी उपलब्ध असलेल्या प्रोत्साहन योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या वेळी HLFPPTच्या डॉ.सरोज चौधरी यांनी उपस्थित डॉक्टरांना मार्गदर्शन केले. तसेच राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम, अलिबाग येथील जिल्हा क्षयरोग कार्यालयाचे जिल्हा पीपीएम समन्वयक सतीश दंतराव यांनी आयुष डॉक्टरांचे क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमातील योगदान अत्यंत मोलाचे असल्याचे नमूद केले. त्यांनी निक्षय मित्र या संकल्पनेची माहिती देत, टीबी रुग्णांना सकस व पोषक आहाराची गरज अधोरेखित केली. सर्वांनी निक्षय मित्र बनून टीबी रुग्णांना दत्तक घेऊन फूड बास्केट उपलब्ध करून दिल्यास टीबी मुक्त रायगडच्या उद्दिष्टास गती मिळेल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

SSHAKTI प्रकल्पाच्या माध्यमातून सार्वजनिक व खासगी आरोग्य क्षेत्र तसेच आयुष डॉक्टरांशी सातत्याने समन्वय ठेवून क्षयरोगमुक्त भारत या राष्ट्रीय उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी जिल्ह्यात प्रभावीपणे कार्य करण्यात येत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

# फुंडे विद्यालयात आपत्ती व्यवस्थापनाचे धडे



**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील तु.ह.वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाखेत नागरी संरक्षण दल उरण रायगड यांच्या मार्फत एक दिवशी आपत्ती व्यवस्थापन प्रात्यक्षिकांसहित प्रशिक्षण घेण्यात आले.

या प्रशिक्षणामध्ये आपत्ती व्यवस्थापन म्हणजे काय, आपत्ती व्यवस्थापनाचे प्रकार, एखादी आपत्ती आल्यानंतर त्याचे व्यवस्थापन कसे करायचे, विविध आपत्तीबाबत माहिती देताना प्रथमोपचार व प्रथमोपचारची तत्वे, आपत्ती झाल्यानंतर सुरुवातीच्या गोल्डन हॉवर्समध्ये काम करत असताना आपल्या शरीरातील रक्ताचे प्रमाण, शरीरामधील रक्त बाहेर पडत असेल तर त्याच्या थांबवण्याच्या पद्धती, शरीराचे तापमान कायम कसं ठेवायचं, अस्थिभंग झाल्यास त्या भागांना आधार देऊन बँडेज कशी बांधावी हे सांगितले.

सर्व प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिके घेण्यासाठी हरेश्वर जनार्दन ठाकूर (विभागीय क्षेत्ररक्षक उरण तालुका, मानसेवी निर्देशक ना. सं. दल उरण, भारत सरकारकडून कांस्यपदक प्राप्त) यांनी महत्त्वाची जबाबदारी घेऊन हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले, त्यांच्यासोबत ज्योती म्हात्रे, रुमाजी डुमणा, समीर थळी, नितेश घरत, कविराज भोईर, अभिमन्यू गोवारी, सुमित कोळी, सुजल पाटील, उपासना गावंड, आकांक्षा देठे, कांक्षिता म्हात्रे, सानिया भोपी, श्रेया भोपी, रेशम कोळी, प्रणाली सकपाळ, हर्षली म्हात्रे, मेघा रोमन, वैष्णवी वर्तक, आयुष मोहिते, भाविक पाटील, विवेक बिंद, दौलत पाटील, श्रीयश पाटील, प्रतिक तांडेल, राजेश म्हात्रे, जान्हवी पाटील, पूजा कडू इत्यादी स्वयंसेवकांनी त्यांचे ज्ञान वापरून हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले.

प्रशिक्षणासाठी एस. डी. नाईक, पी. ए. पाटील यांचे सहकार्य लाभलेप्राचार्य बी. बी. साळुंखे, उपप्राचार्या, पर्यवेक्षिका, व सर्व सेवकवृद, विद्यार्थी उपस्थित होते.

## संपादकीय

# मुलींकडे लक्ष हवे

रायगड जिल्ह्यात मागील अकरा महिन्यांत १८ वर्षांखालील ७० अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याची माहिती समोर आली आहे. ही आकडेवारी १ जानेवारी ते ३० नोव्हेंबरदरम्यानची असून जिल्ह्यातील २१ पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील या घटना आहेत. बेपत्ता मुलींपैकी अनेक मुली सापडल्याचेही वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. मुली व महिला बेपत्ता होण्याचे वाढते प्रमाण ही आज देशपातळीवरील समस्या असून त्यामागे अनेक कारणे आहेत. वाढती आकडेवारी लक्षात घेऊन पालकांनी व सर्वसंबंधितांनी आवश्यक ती काळजी घेण्याची गरज आहे.

**मुली व महिला बेपत्ता होण्याचे प्रमाण देशभरात वाढत असल्याचे दिसते. प्रेमप्रकरणातून, स्वत:च्या पसंतीने लग्न करण्यासाठी यातील निम्म्या मुलींनी घर सोडले असे गृहित धरले तरी उर्वरित निम्म्या मुलींचे काय हा प्रश्न उरतोच. गेल्या वीस-पंचवीस वर्षांत देशभरातच नव्हे तर जगभरात बेपत्ता व्यक्तींच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसते. आपल्या देशापुरते पाहिले तर, २०२२ मध्ये ७ लाख ८५ हजार मुली बेपत्ता झाल्या होत्या. यापैकी चार लाख मुली सापडल्या असे एनसीआरबीच्या (नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरो) अहवालात म्हटले आहे. २०२३ मध्ये ८ लाख ६८ हजार ५५९ मुली गायब झाल्या आणि त्यातील ४ लाख ६० हजार ८८६ मुली सापडल्या. मागील पाच वर्षांत १८ लाख मुलींचा तपास लागलेला नाही. २०१६ साली तपास न लागलेल्या मुलींचे वार्षिक प्रमाण १७ हजार ४०० इतके होते, ते २०२२ साली २९ हजार ४०० इतके झाले. यातील निम्म्या मुली लग्न करण्यासाठी घरातून निघून गेल्या असे मानले तरी उर्वरित मुलींचा आकडाही मोठाच आहे. शिक्षण, प्रसारमाध्यमे, चित्रपट, सोशल मीडिया आदींमधून गावखेड्यातल्या मुलींनाही शहरी स्त्रियांची स्वतंत्र जीवनशैली नजरेस पडते. त्यामुळे नोकरीच्या आमिषानेही मुली घर सोडतात असे दिसते. यातील काही मुलींच्या वाट्याला वेठबिगारी, शारीरिक-मानसिक शोषण, मारहाण व काही वेळा तर शरीरविक्रयाच्या धंद्यात लोटले जाणेही नशिबी येते. मानवी तस्करीकडे सरकारी पातळीवरून गांभीर्याने पाहिले जाते आहे. त्याकरिता ऑपरेशन मुस्कानसारखी मोहीम राबवून जुलै २०१५ ते डिसेंबर २०२४ या काळात चार लाख १४ हजार १९३ अल्पवयीन मुलांचा शोध घेण्यात आला आहे. चंगळवाद व वाढत्या शहरीकरणाचा तरुण पिढीतील मुलामुलींच्या मानसिकतेवर मोठा परिणाम झाल्याचे दिसते आहे. अनेकदा पालकांनी लहानसहान कारणांवरून टोकल्यावरही मुले व मुली घर सोडतात वा टोकाचे पाऊल उचलतात. प्रेमप्रकरणांमुळे मुलींनी घर सोडून जाण्याचे प्रमाणही वाढले आहे. यातील काहींची प्रेमाच्या नावाखाली फसवणूकही होते. एकंदरच ही समस्या गंभीर स्वरूप धारण करत असल्याने पालकांनी तर सावध रहायचे आहेच, पण शाळा-कॉलेजांनीही यासंदर्भात मुलामुलींशी संवाद साधून त्यांना घराबाहेरील धोक्यांची कल्पना देण्याची गरज आहे. पालकांनीही आपल्या मुलांशी उत्तम संवाद कसा निर्माण होईल व मुलेमुली वयात आल्यानंतरही तो टिकून कसा राहील याकडे लक्ष दिले पाहिजे. पौगंडावस्थेतील मुलांशी वाद घालण्यापेक्षा त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. गरज पडल्यास तज्ज्ञ समुपदेशकाची मदत घेतली पाहिजे. सार्वजनिक ठिकाणी कुणीही व्यक्ती एकाकी, भ्रमिष्ट वा भयभीत अवस्थेत आढळल्यास पोलिसांना वा संबंधित हेल्पलाइनला कळवण्याचे कर्तव्य सर्व नागरिकांनी बजावण्याची गरज आहे.**

# भारतीय अंतराळ कार्यक्रमाचे जनक विक्रम साराभाई



डॉ. विक्रम अंबालाल साराभाई हे एक प्रसिद्ध भारतीय भौतिकशास्त्रज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ होते. १२ ऑगस्ट १९१९ रोजी जन्मलेले विक्रम साराभाई यांनी भारतीय अंतराळ कार्यक्रमाला जन्म दिला. त्यांचा जन्म अहमदाबाद येथे झाला होता. त्यांचे वडील अंबालाल साराभाई आणि आई सरलादेवी होत्या. त्यांचे वडील खूप मोठे व्यापारी होते.

भारतीय अंतराळ कार्यक्रमाचे जनक म्हणून यांनी देशाला अंतरिक्षमध्ये पोहचण्यात खूप मदत केली आणि देशात परमाणू शक्ती विकसित करण्यामध्येदेखील आपले योगदान दिले. डॉ. विक्रम साराभाई यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळुरू येथे भौतिकशास्त्रज्ञ चंद्रशेखर वेंकट रमण यांच्या मार्गदर्शनात कॉस्मिक रेज यावर शोध केले. त्यांनी आपला पहिला संशोधन लेख टाईम डिस्ट्रिब्युशन ऑफ कॉस्मिक रेज प्रोसिडिंग ऑफ द इंडियन अकॅडमी ऑफ सायन्सेसमध्ये प्रकाशित केला. साराभाई यांनी १९४०-४५ या कालावधीत वैश्विक किरणांवरील संशोधन कार्यामध्ये बंगळुरू येथील गीगर-मुलर काउंटर आणि काश्मीर-हिमालयातील उच्चस्तरीय केंद्रावरील वैश्विक किरणांच्या काळातील फरकांचा अभ्यास केला.

१९६६मध्ये भौतिकशास्त्रज्ञ डॉ. होमी जहांगीर भाभा यांच्या निधनानंतर डॉ. विक्रम साराभाई यांना भारतीय अणुऊर्जा आयोगचे अध्यक्ष बनवले गेले. भारतीय अंतरिक्ष अनुसंधान संस्था (इस्रो)ची स्थापना यांनी केलेल्या अनेक महत्त्वाच्या कार्यांपैकी सर्वांत मोठी उपलब्धी आहे. रशियन उपग्रह 'स्पुतनिक'च्या प्रक्षेपणानंतर भारतासारख्या विकासशील देशासाठी अंतराळ कार्यक्रमाचे महत्वाबद्दल त्यांनी सरकारला कळवली. डॉ. विक्रम साराभाई हे अंतराळ कार्यक्रमाच्या महत्त्वावर जोर देऊन म्हणाले, राष्ट्राचा विकास हा तेथील लोकांच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या आकलनाशी आणि वापराशी घनिष्ठपणे जोडलेला आहे.


डॉ. साराभाई यांच्या नेतृत्वाखाली पहिल्या भारतीय उपग्रह 'आर्यभट्ट'चे निर्माण कार्य सुरु झाले आणि १९७५मध्ये रशियन उपग्रह प्रक्षेपण वाहनाच्या मदतीने प्रक्षेपित केले गेले. याप्रमाणे भारताच्या अंतराळ कार्यक्रमाची सुरुवात झाली.

डॉ. विक्रम साराभाई यांचा विवाह सुप्रसिद्ध शास्त्रीय नृत्यांगना मृणालिनी स्वामिनाथन यांच्यासोबत झाला होता. या दोघांनी कलाचे प्रचार आणि शिक्षणासाठी १९४९मध्ये 'दर्पण अकादमी ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स'ची स्थापना केली. त्यांनी भारताचे फार्मास्युटिकल उद्योगातदेखील महत्त्वाचे योगदान दिले. हे फार्मास्युटिकल उद्योगात इलेक्ट्रॉनिक डेटा प्रोसेसिंग आणि ऑपरेशन्स रिसर्च तंत्र लागू करणारे पहिले व्यक्ती होते. त्यांच्या सतत प्रयत्नांमुळे भारत औषध उद्योगात स्वावलंबी बनले. भारतीय प्रबंधक संस्थान, अहमदाबादची स्थापना करण्यामध्येदेखील त्यांनी सहकार्य दिले.

१९६२मध्ये डॉ. विक्रम साराभाई यांना शांतीस्वरूप भटनागर मेडल देण्यात आला. १९६६मध्ये पद्मभूषण आणि १९७२मध्ये पद्मविभूषण दिला गेला. ३० डिसेंबर १९७१ रोजी त्यांचे निधन झाले. तिरुअनंतपुरम येथील थुंबा इक्वेटोरियल रॉकेट लॉन्चिंग स्टेशन आणि संबंधित अवकाश संस्थांचे नामकरण महान शास्त्रज्ञाच्या सन्मानार्थ विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे करण्यात आले. हे भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे प्रमुख अंतराळ संशोधन केंद्र म्हणून उदयास आले आहे. १९७४मध्ये सिडनीस्थित इंटरनॅशनल अॅस्ट्रॉनॉमिकल युनियनने ठरवले की 'सी ऑफ सेरेनिटी'वरील बेसाल्ट मून क्रेटर आता साराभाई विवर म्हणून ओळखले जाईल. १९७२मध्ये त्यांच्या मृत्यूच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त भारतीय टपाल विभागाने एक टपाल तिकीट जारी केले होते.

**(साभार : वेबदुनिया)**

# संगीतकार दत्ता नाईक ऊर्फ एन. दत्ता



बाबूराव नाईक ऊर्फ एन. दत्ता यांचे नाव घेताच, कर्णमधुर संगीताने नटलेल्या 'मिलाप', 'मरीन ड्राइव', 'चंद्रकांता', 'साधना', 'धूल का फूल', 'ब्लॅककॅट', 'धरमपुत्र', 'ग्यारह हजार लड़कियों', 'काला समुदर' व 'चांदी की दीवार'सारख्या हिंदी, तर 'मधुचंद्र', 'अपराध' व 'बाळा गाऊ कशी अंगाई'सारख्या मराठी चित्रपटांची मालिकाच डोळ्यांपुढून तरळून जाते. त्यांचा जन्म १२ डिसेंबर १९२७ गोव्याच्या उत्तर भागातल्या पेडणे तालुक्यातील आरोबा या गावी झाला. लहानपणापासूनच गोवन व पोर्तुगीज लोकसंगीत सातत्याने कानावर पडत असल्याने जात्याच संगीतात रस असणारे एन दत्ता नादावून गेले नसल्यासच नवल


शालान्त परीक्षेनंतर त्यांनी थेट मुंबई गाठली व देवघर संगीत विद्यालयात संगीताचे रीतसर शिक्षण घेतले. सुरुवातीला काही काळ संगीतकार हेमत केदार यांच्याकडे काम केल्यानंतर गुलाम हैदर यांच्याकडे मिळालेल्या समृद्ध अनुभवामुळे त्याच्यातील प्रगल्भ संगीतकार अधिकाधिक चहरत गेला. त्या वेळी गुलाम हैदर चॉम्बे टॉकीज व व फिल्मस्तानच्या चित्रपटांचे संगीत करीत असत. स्वातंत्र्यपूर्व काळात होत असलेल्या देशभक्तिपर मेळ्यातून एन. दत्तांना आगळ्यावेगळ्या ढंगातील गाणी गाताना सचिनदेव बर्मन यानी ऐकले होते व आपल्याकडे सहाय्यक म्हणून काम करण्याची 'ऑफर 'ही दिली होती.

फाळणीनंतर गुलाम हैदर पाकिस्तानात निघून गेले व सचिन देव बर्मन फिल्मस्तानचे संगीतकार बनले. त्यानंतर एन. दत्ता त्यांचे सहाय्यक बनले. सचिनदांच्या 'अफसर', 'एक नजर', 'नौजवान', 'टैक्सी ड्रायव्हर', 'सुनीमजी' ते थेट 'देवदास'पर्यंत त्यांनी सचिनदांकडे सहाय्यक संगीतकाराची धुरा समर्थपणे सांभाळली. या काळातल्या एस.डी. बर्मन यांच्या कित्येक चालीवर एन.दत्तांच्या शैलीचा प्रभाव दिसून येतो एस.डी. बर्मन यांच्या 'बुजदिल'मधील लताबाईंच शास्त्रीय सुरावटीतील 'झन झन झन पायल बाजे' हे लोकप्रिय गाणं एन. दत्ता यांचं असल्याची चर्चा त्या काळी सर्वत्र होत होती

'जाल' या चित्रपटाची पार्श्वभूमी गोव्याची असल्याने या चित्रपटाचे संगीत गोमंतकीय लोकसंगीतावर आधारित होते. सचिनदांना एन. दत्ता हे गोवेकर असल्याचे माहीत असल्याने त्यांनी गोवन लोकसंगीतावर आधारित गाण्यांना चाली लावावाचे स्वातंत्र्य दिलं होतं. दत्ताजींचा स्वभाव विनम्र व भिडस्त असल्याने त्यांनी अशा गोष्टीचं भांडवल करून चालीचं श्रेय लाटण्याचा प्रयन कधीच केला नाही. 'टैक्सी ड्रायव्हर'पासून एस.डी. बर्मन यांचे दुसरे सहाय्यक बनलेले जयदेव मात्र परखड स्वभावाचे असल्याने अशा गोष्टी ते स्पष्टपणे बोलून दाखवत. 'बुजदिल' व 'जाल' या चित्रपटांचे निर्मिती असलेल्या फत्तेचंद यांनी एन दत्तांची प्रतिमा ओळखली होती. म्हणूनच १९५५ साली राज खोसला दिग्दर्शित 'मिलाप' या चित्रपटाच्या संगीताची धुरा त्यांनी विश्वासाने त्यांच्यावर सोपविली. एन. दत्तांनी फत्तेचंद यांचा विश्वास सार्थ ठरवत पदार्पणातच अप्रतिम कामगिरी केली. बी. आर. चोत्रांच्या 'धूल का फूल' या चित्रपटात एकापेक्षा एक सरस व यादगार गाणी एन. दत्तांनी या चित्रपटात दिली आहेत. लता मंगेशकरांबरोबर महेंद्र कपूरने गायलेले 'तेरे प्यार का आसरा चाहता हूँ है शायरी दंगातलं युगुलगीत व 'धड़कने लगी दिल के तारों की दुनिया' हे महेंद्र कपूर व आशा भोसलेच्या स्वराताल चिरतरुण प्रेमगीत एन दत्तांनी अप्रतिम सुरावटीत बांधलं आहे. तू हिंदू बनेगा न मुसलमान बनेगा' हे अर्थपूर्ण गाणं रफीच्या, तर 'कासे कहूं मन की बात' हे गाणं सुधा मल्होत्राच्या अजरामर गाण्यांपैकी एक समजले जाते.

मराठी चित्रपटांना संगीत देऊन त्यांनी तेथेही आपला ठसा उमटविला. त्यातील अपराध व बाळा गाऊ कशी अंगाई या चित्रपटांना सर्वोत्कृष्ट संगीताचा पुरस्कार मिळाला. महाराष्ट्र शासनाने नागरी पुरस्कार देऊन त्यांना गौरविले होते. ३० डिसेंबर १९८७ रोजी त्यांचे निधन झाले.


**-संजीव वेलणकर, पुणे**



## बदलते तंत्रज्ञान

# मोबाईलवरील एक मेसेज तुमचं बँक खातं रिकामं करू शकतो

तुम्हाला कधी अनोळखी नंबरवरून स्वस्त लोन, लॉटरी किंवा गुंतवणुकीचे मेसेज आले आहेत का? जर हो, तर तुम्ही सायबर गुन्हेगारांच्या



रडारवर असू शकता. केंद्रीय अन्वेषण विभागाने अर्थात सीबीआयने नुकताच दिल्ली, नोएडा आणि चंदीगडमध्ये पसरलेल्या एका सायबर नेटवर्कचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत हजारो बेकायदेशीर सिम कार्ड आणि हाय-टेक उपकरणे जप्त करण्यात आली असून 'सिम बॉक्स स्कॅम'चा हा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

'सिम बॉक्स' हे एक विशेष हाय-टेक मशीन आहे. यात एकाच वेळी शेकडो किंवा हजारो सिम कार्ड बसवता येतात. या तंत्रज्ञानाचा वापर करून सायबर चोर परदेशातून येणारे कॉल भारतीय स्थानिक कॉलसारखे भासवतात. यामुळे कॉल नेमका कुठून आला आहे याचे लोकेशन ट्रॅक करणे पोलिसांनाही कठीण जाते. गुन्हेगार याच मशीनचा वापर करून दररोज लाखो लोकांना फसवणुकीचे मेसेज धाडतात.


गुन्हेगार बनावट कागदपत्रांच्या आधारे मोठ्या प्रमाणात सिम कार्ड खरेदी करतात. हे सिम कार्ड मशीनमध्ये टाकून दररोज लाखो लोकांना फिशिंग लिंक्स, बनावट बँक अलर्ट किंवा बक्षीस जिंकल्याचे मेसेज पाठवले जातात. जसा एखादा सामान्य नागरिक त्या लिंकवर क्लिक करतो किंवा आपली माहिती शेअर करतो, तसा गुन्हेगारांना त्याच्या बँक खात्याचा आणि पर्सनल डेटाचा एक्सेस मिळतो. काही वेळातच तुमची आयुष्यभराची कमाई लंपास होऊ शकते.

तज्ज्ञांच्या मते, सिम बॉक्स स्कॅम केवळ आर्थिक फसवणुकीपुरता मर्यादित नाही. परदेशी कॉल्सची ओळख लपवली जात असल्याने हे राष्ट्रीय सुरक्षेसाठीही मोठे आव्हान ठरू शकते. परदेशी गुन्हेगार भारतात बसलेल्या हस्तकांच्या मदतीने हे रॅकेट चालवत असल्याचे तपासात समोर आले आहे.

**स्वत:चा बचाव कसा करावा?**

कर्ज, नोकरी किंवा लॉटरीचे आमिष दाखवणाऱ्या कोणत्याही लिंकवर चुकूनही क्लिक करू नका. आपल्या फोनमध्ये स्पॅम फिल्टर किंवा 'ब्लॉक' फीचर सुरू ठेवा, ज्यामुळे संशयास्पद मेसेज आपोआप थांबवले जातील. जर तुम्हाला संशयास्पद अनुभव आला, तर तत्काळ सरकारी सायबर क्राईम पोर्टल cybercrime.gov.in वर तक्रार नोंदवा. पासवर्ड बदला आणि बँकेला माहिती देऊन खाते सुरक्षित करा.

# कविवर्य मंगेश पाडगावकर



'या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे', 'भातुकलीच्या खेळामधली', 'शुक्रतारा मंद वारा' ही गाणी आणि प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आमचं अगदी 'सेम' असतं, ही कविता म्हटली की आपल्या डोळ्यासामोर नांव येते ते म्हणजे मंगेश पाडगावकरांची आज जयंती. त्यांचा जन्म वेंगुर्ले येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव केशव आत्माराम पाडगावकर. मंगेश पाडगावकरांच्या आई रखमाबाई त्यांना केशवसुत, बालकवी, गोविंदाग्रज ह्यांच्या कविता वाचून दाखवत असत. त्यामुळे बालवयातच पाडगावकरांना लय, छंद, वृत्त यांची जाण नकळत येत गेली.

आपला मुलगा मोठा कवी व्हावा, असे आईचे स्वप्न होते. आईच्या काव्यप्रेमाची परिणती नवव्या-दहाव्या वर्षात पाडगावकरांच्या काव्यलेखनात झाली. पुढे मुंबईत त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण विल्सन हायस्कूलमध्ये व विल्सन कॉलेजमध्ये झाले. वा.ल. कुलकर्णींच्या अध्यापनाचा आणि सहवासाचा परिणाम संवेदनशील पाडगावकरांवर झाला. त्याचप्रमाणे भा.रा. तांबे, कुसुमाग्रज, बा.भ.बोरकर या सौंदर्यवादी कवींच्या काव्याचा प्रभाव पाडगावकरांवर पडला. १९४९ साली पुण्यात झालेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनात त्यांनी सादर केलेली 'करि माझ्या दीप युगाचा रे' ही कविता ऐकून विठ्ठलराव घाटे यांनी 'उद्याचा


## निमित्त

कवी' या शब्दांत पाडगावकरांची प्रशंसा केली. पाडगावकरांचा 'धारानृत्य' हा पहिला संग्रह १९५० साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर पाडगावकरांची एकूण ४२ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. पाडगावकरांच्या स्वतंत्र काव्य निर्मितीला खरी सुरुवात 'जिप्सी' (१९५३) या संग्रहापासून झाली.

'निंबोणीच्या झाडामागे' (१९५६) या पाडगावकरांच्या एकमेव लघुनिबंध-संग्रहातील लघुनिबंध काव्यानुभवाच्या जवळ जाणारे आहेत. एखादी निसर्गस्थिती किंवा मनोवस्था जेव्हा पाडगावकरांच्या हृदयाचा कब्जा घेते, तेव्हा त्यांची उदास, व्याकुळ आणि काव्यात्म भाववृत्ती लघुनिबंधातून प्रकट होते. काव्यात्म वृत्तीने व संवेदनशीलपणे केलेले लघुनिबंध-लेखन भावविवश, भाबडे वा कृत्रिम होत नाही. दुबईमध्ये झालेल्या दुसऱ्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचे पाडगावकर अध्यक्ष होते. २०१३मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २००८मध्ये त्यांना राज्यातील प्रतिष्ठेचा महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. १९८०मध्ये सलाम या कविता संग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला.

पाडगावकर यांनी 'गझल', 'विदुषक', 'सलाम' या काव्यसंग्रहातून राजकीय आशयाची व उपरोधिकपणा असलेली समाजातील विसंगतीवर प्रहार करणारी कविता केली. सत्तेच्या संपर्कात राहणाऱ्या वर्गातील लोकांनी सांस्कृतिक व साहित्यिक क्षेत्रातील माणसांचा केलेला मानभंग, मध्यमवर्गीयांमध्ये आलेली लाचारी, दांभिकता याबद्दल पाडगावकर यांच्या मनात संताप होता तो या कवितांमधून व्यक्त झाला. १९६०नंतरच्या वास्तवावर भेदकपणे प्रकाश टाकणारी पाडगावकर यांची कविता नवसमृद्ध वर्गाची, त्याच्या संवेदनाहीन मनाची चिरफाड करून वाचकांना अंतर्मुख करते. पाडगावकरांची कविता सादर करण्याची एक विशेष ढब होती. त्या ऐकताना श्रोते जसे खळखळून हसत तसेच मंत्रमुग्धही होत. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा






## आरोग्य प्रहर

# जेट स्प्रेचा चुकीचा वापर ठरू शकतो धोकादायक!

आजकालच्या धावपळीच्या जीवनात आपण स्वच्छतेसाठी आधुनिक साधनांचा वापर करतो, परंतु अनेकदा त्यांच्या वापराची योग्य पद्धत आपल्याला माहीत नसते. स्वच्छतागृहातील 'जेट स्प्रे' हे असेच एक साधन आहे. अनेक महिला स्वच्छतेच्या अतिरेकापोटी किंवा सोयीसाठी योनीमार्गावर थेट जेट स्प्रेचा जोरात मारा करतात, ज्यामुळे गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात.



स्त्रीच्या योनीमार्गात नैसर्गिक रित्या 'लॅक्टोबॅसिलस'सारखे चांगले बॅक्टेरिया असतात, जे योनीचे इन्फेक्शनपासून संरक्षण करतात. जेट स्प्रेच्या जोराच्या पाण्यामुळे हे संरक्षक बॅक्टेरिया वाहून जातात. यामुळे तिथला नैसर्गिक पीएच बॅलन्स बिघडतो आणि योनीमार्ग कोरडा पडतो किंवा तिथे जंतूंचा संसर्ग सहज होतो.

पाण्याचा दाब खूप जास्त असेल, तर ते पाणी योनीमार्गातून गर्भाशयाच्या ग्रीवेपर्यंत पोहचू शकते. यामुळे बाहेरील बॅक्टेरिया शरीराच्या आत ढकलले जातात, ज्यामुळे गर्भाशयाला सूज येणे किंवा पीआयडीसारखे गंभीर आजार होण्याची शक्यता वाढते.

योनीच्या आसपासची त्वचा अत्यंत नाजूक आणि संवेदनशील असते. जेट स्प्रेचा पाण्याचा वेग जास्त असल्यास त्या त्वचेवर बारीक जखमा किंवा ओरखडे येऊ शकतात. यामुळे तिथे खाज सुटणे, जळजळ होणे किंवा लाल रॅशेस येण्याचा त्रास होऊ शकतो.

अनेकदा जेट स्प्रेचा अँगल चुकीचा असल्यास, गुदद्वाराकडील बॅक्टेरिया पाण्याचा दाबाने मूत्रमार्गाकडे ढकलले जातात. यामुळे महिलांमध्ये UTI म्हणजेच लघवीच्या जागी इन्फेक्शन होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो.

सतत जोरात पाणी मारल्यामुळे तिथल्या नैसर्गिक ओलाव्याचे प्रमाण कमी होते. यामुळे लैंगिक संबंधांच्या वेळी वेदना होणे किंवा सतत अस्वस्थ वाटणे अशा समस्या जाणवू शकतात.

**सुरक्षित स्वच्छतेसाठी 'या' गोष्टी लक्षात ठेवा**

जेट स्प्रे वापरताना पाण्याचा वेग अत्यंत कमी ठेवावा. पाणी थेट योनीमार्गाच्या छिद्रावर न मारता आसपासच्या भागावर मारावे. नेहमी समोरून मागे अशा दिशेने स्वच्छ करावे, जेणेकरून मागील भागातील बॅक्टेरिया पुढे येणार नाहीत. स्वच्छतेनंतर मऊ टॉवेल किंवा टिश्यू पेपरने तो भाग हलक्या हाताने टिपून कोरडा करावा. ओलसरपणामुळे फंगल इन्फेक्शन वाढू शकते.

# माणगावमध्ये स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मारकाची दुरवस्था

## प्रशासनाकडे सुशोभिकरणाची मागणी

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

माणगाव व तळा तालुक्याच्या मातीतून तब्बल ७७ स्वातंत्र्य सैनिकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले प्राण अर्पण केले, तर अनेकांनी अमानुष कारावास, हालअपेष्टा आणि अन्याय सहन केला. या थोर हुतात्म्यांच्या पवित्र स्मृती जपण्यासाठी माणगाव येथील जुन्या पंचायत समितीच्या आवारात, अत्यंत दर्शनीय व मध्यवर्ती ठिकाणी स्वातंत्र्य सैनिकांचे भव्य व आकर्षक स्मारक उभारण्यात आले होते.

आज हेच स्मारक दुरवस्थेत गेले असून धुळखात उघडे पडले आहे. हे दृश्य पाहून स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटुंबी यांसह सर्वसामान्य नागरिकांच्या मनात तीव्र संताप, वेदना आणि अस्वस्थता निर्माण झाली आहे. स्वातंत्र्याला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त राज्य सरकारने महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिक, हुतात्मे व कारावास भोगलेल्या देशभक्तांच्या स्मरणार्थ हे स्मारक उभारले होते. कालांतराने नवीन तहसील कार्यालय सुरू झाल्यानंतर हे स्मारक स्थलांतरित करण्यात आले, मात्र



त्यानंतर या स्मारकाकडे कोणीही ढुंकून पाहिले नाही.

स्मारकाच्या आजूबाजूला गवताचे साम्राज्य पसरले असून स्वच्छतेचा पूर्ण अभाव दिसून येतो. कोरलेली स्वातंत्र्य सैनिकांची नावे धुळीच्या जाड थराखाली लपून गेली आहेत. अनेक ठिकाणी अक्षरे अस्पष्ट झाली असून काही नावे तर पूर्णपणे अदृश्य होण्याच्या मार्गावर आहेत. ज्यांनी देशासाठी हसत-हसत बलिदान दिले, तुरुंगवास सहन केला, अत्याचार झेलले-त्यांच्या नावांचाच सन्मान आज पुसला जात आहे, ही अत्यंत वेदनादायक बाब आहे.

दुर्दैवाची बाब म्हणजे या स्मारकात ज्यांची नावे कोरली आहेत, त्यांपैकी बहुतेक सर्व स्वातंत्र्य सैनिक आज स्वर्गवासी झाले आहेत. जिवंत असताना त्यांना अपेक्षित मान-सन्मान मिळाला नाही. आता तरी त्यांच्या त्यागाची किमान आठवण जपली जावी, अशी जनभावना आहे. आज नागरिकांकडून एकच सवाल उपस्थित केला जात आहे. ज्या स्वातंत्र्यामुळे आपण आज मुक्त श्वास घेतो, त्या स्वातंत्र्याच्या शिल्पकारांनाच विसरणे हे राष्ट्र म्हणून आपले अपयश नाही का? म्हणूनच या ऐतिहासिक स्मारकाचे तातडीने नूतनीकरण करून, स्वच्छता, संरक्षक व्यवस्था व योग्य देखभाल करण्यात यावी, तसेच स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मृतींना पुन्हा सन्मानाचे स्थान मिळावे, अशी जोरदार आणि भावनिक मागणी माणगाव तालुक्यातून होत आहे.

शासनाने या शेकडो स्वातंत्र्य सैनिकांच्या आत्म्यांना शांती व मुक्ती देण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा सर्वसामान्य नागरिक व्यक्त करीत आहेत.

# शेलूमध्ये अल्पवयीन मुलीसोबत अश्लील वर्तन करणारा अटकेत

## नेरळ पोलिसांची तत्काळ कारवाई

**नेरळ : प्रतिनिधी**

नेरळ पोलीस ठाणे हद्दीत शेलू (ता. कर्जत) येथे अल्पवयीन मुलीसोबत अश्लील वर्तन केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून, नेरळ पोलिसांनी अवघ्या काही तासांत आरोपीस अटक केली आहे.

२६ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी सुमारे ४:४५ वाजता शेलू बांधिवली परिसरात राहणारे फिर्यादी यांची मुलगी व मुलगा इमारतीखाली सायकल चालवत होते. यावेळी मुलगी नव्या सायकलसाठी घंटी आणण्यासाठी जिन्यावरून घरी जात असताना, त्याच इमारतीत राहणाऱ्या आरोपीने जिन्यावरच मुलीला जबरदस्तीने स्वतःच्या मांडीवर बसवले.

मुलगी तेथून निघून घरी जाण्याचा प्रयत्न करत असताना आरोपीने तिचा हात धरून तिला पुन्हा घरात नेले व स्वतःच्या मांडीवर बसवून तिची पँट काढण्याचा प्रयत्न केला. तसेच आरोपीने अल्पवयीन मुलीसोबत अश्लील वर्तन केल्याचा आरोप फिर्यादींने पोलिस तक्रारीत नमूद केला आहे.

या प्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७५(१) (एक) तसेच बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम (झजउझ) २०१२ चे कलम ८ व १२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नेरळ पोलिसांनी तात्काळ कारवाई करत दिनांक २७ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १२:२२ वाजता आरोपीस अटक केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्राची पांगे करीत आहेत.

अल्पवयीन मुलांच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश नेरळ पोलिसांनी या कारवाईतून दिला आहे.

# माणगाव मोर्बा येथे दुचाकीच्या धडकेत सायकलस्वाराचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव-मोर्बा रस्त्यावर एच.पी.पेट्रोल पंपाच्यापुढे युनिकोर्न मोटरसायकलची सायकलस्वारास पाठीमागून जोरदार धडक बसल्याने झालेल्या भीषण अपघातात सायकलस्वाराचा मृत्यू झाला.

अपघाताची घटना सोमवारी (दि.२९) सकाळी ६ : ४५ वाजण्याच्या सुमारास घडली. या अपघाताच्या गुन्ह्याची फिर्याद शौकत युनूस रोहेकर (वय ६२, रा.राऊत मोहल्ला, मोर्बा ता.माणगाव) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

अपघाताच्या गुन्ह्याबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, अपघातातील मयत उमर उस्मान राऊत (वय ६५) रा.मोर्बा,ता.माणगाव हे कामावरून त्याचे सायकलवरून घरी जात असताना त्यांचे पाठीमागून माणगाव बाजूकडून मोर्बा बाजूकडे येणारे आरोपी खालीद अहमद अब्दुल रशीद खान (वय ४९) रा.मोर्बा,ता.माणगाव हे त्यांचे युनिकोर्न मोटार सायकल (एमएच.०६ सी.एच.६०३१) या गाडीवरून त्यांच्या मुलास पाठीमागे बसवून अतिवेगाने रोडच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून ही मोटरसायकल चालवीत जात असताना मयत सायकलस्वार उमर उस्मान राऊत यांस पाठीमागून ठोकर मारून अपघात केला.

अपघातात मयत यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. तसेच या अपघातात आतिफ अब्दुल्ला खालिद (वय १७) रा.मोर्बा, ता.माणगाव हे जखमी होऊन मोटार सायकलचे नुकसान झाले. या अपघाताच्या गुन्ह्याची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात मोटार फेटल अपघात गुन्हा रजि. नं.३२७/२०२५ भा.न्या.सं.कलम १०६(१),१२५ अ,१२५ ब,२८१ मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे दाखल करण्यात येऊन मोटार सायकल चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघाताच्या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक निवृत्त बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार मंदार लहाने हे करीत आहेत.

# कनकेश्वर फाटा येथे लायन्स फेस्टिव्हल

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग-मांडवा रोडवरील कनकेश्वर फाटा येथे लायन्स क्लब ऑफ अलिबाग-मांडवा यांच्या वतीने भव्य 'लायन्स फेस्टिव्हल'चे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव ८ जानेवारी ते १२ जानेवारी २०२६ या कालावधीत दररोज सायंकाळी ४ ते रात्री १० वाजेपर्यंत रंगणार असून, स्थानिकांसह पर्यटकांसाठी हे आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे.

या महोत्सवाचे नेटके नियोजन फेस्टिवल चेअरमन नितीन अधिकारी आणि समन्वयक एमजेएफ अमिष शिरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली फेस्टिवल कमिटीद्वारे करण्यात येत आहे. या कमिटीमध्ये प्रवीण सरनाईक, अनिल जाधव, अभिजीत गुरव, धवल राऊत, सुधीर पुरो, ऋग्वेद ठाकूर, हर्षद पाटील, गिरीश म्हात्रे, डॉ. रेखा म्हात्रे आणि अरविंद घरत या अनुभवी टीमचा समावेश असून त्यांच्या देखरेखीखाली महोत्सवाची तयारी सुरू आहे. पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवात लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांसाठी मनोरंजनाची पर्वणी असणार आहे, ज्यामध्ये विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, गृहोपयोगी वस्तू, सौंदर्य प्रसाधने आणि मुलांसाठी खास अम्युझमेंट पार्कचा समावेश आहे. आर. डी. सागवेकर ज्वेलर्स यांच्या सौजन्याने महोत्सवात दररोज 'लकी ड्रॉ'चे आयोजनही करण्यात आले आहे. महोत्सवाचा शुभारंभ ८ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता उद्घाटन सोहळ्याने होईल, त्यानंतर रात्री ७:३० वाजता शालेय नृत्य स्पर्धा पार पडतील. ९ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता 'मराठमोळी झेड-फ्युजन' आणि रात्री ७:३० वाजता 'दर्याभवानी' हे ऐतिहासिक नाट्य सादर केले जाणार आहे.

शनिवार, १० जानेवारी रोजी रात्री ७:३० वाजता 'शिवकालीन परंपरा' हा आधुनिक फॅशनच्या जगातील मराठी संस्कृती जपणारा सोहळा रंगणार असून, याचे कोरिओग्राफर अशमीक कामठे आहेत. ११ जानेवारी रोजी रात्री ७:३० वाजता 'लायन्स मांडवा श्री २०२६' ही भव्य शरीरसौष्ठव स्पर्धा रंगणार आहे.

महोत्सवाचा समारोप १२ जानेवारी रोजी रात्री ७:३० वाजता 'हेअर अँड ब्युटी ईल्युजन २०२६' या सौंदर्य स्पर्धेने होईल. या संपूर्ण उपक्रमाला ग्रुप ग्रामपंचायत बोरीस-गुंजीस आणि अनुप मेहता अँड ग्रुप यांचे विशेष सहकार्य लाभले असून, जास्तीत जास्त नागरिकांनी या महोत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# फार्महाऊसमध्ये शिरलेल्या नऊ फुटी अजगराला जीवदान



**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील धोंडसे येथील राकेश रंजन यांच्या वंश फार्महाऊस मध्ये शनिवारी (ता.२७) रात्री एक नऊ फुटी अजगर आला होता. त्या अजगराला पालीतील सर्पमित्र दत्तात्रय सावंत यांनी मोठ्या सिताफीने पकडले आणि सुधागड तालुका वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली सुखरूप सुरक्षित अधिवासात सोडून दिले. सर्प मित्रांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होतेय.

अजगर आल्याची माहिती येथील रहिवासी तन्मय गायकवाड व किरण जाधव यांनी सर्प मित्रांना दिली. अजगराला पाहून येथील राहिवाशांची भंबेरी उडाली होती, मात्र सर्पमित्र आल्यावर त्यांनी सुटकेचा निश्वास सोडला.


घरात, घराजवळ किंवा मानवी वस्तीमध्ये साप आल्यास कोणीही घाबरून न जाता तसेच सापाला कोणतीही दुखापत न करता व त्याला न मारता जवळच्या सर्पमित्राला बोलवावे, असे आवाहन या वेळी सर्पमित्र दत्तात्रय सावंत यांनी उपस्थितांना केले. यासोबतच नागरिकांना सापांविषयी मार्गदर्शन केले.

# माथेरान नगर परिषदेच्या शाळेची डागडुजी

**माथेरान : प्रतिनिधी**

शहराच्या मध्यवर्ती भागात असणाऱ्या वीर हुतात्मा भाई कोतवाल नगरपरिषदेच्या शाळेचे रुपडे पालटताना दिसत असून याकामी मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली कॅरिंग फ्रेंड्स संस्था मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने येथील वीर हुतात्मा भाई कोतवाल नगर परिषदेच्या शाळेची डागडुजी त्याचप्रमाणे रंगरंगोटी, परिसराची स्वच्छता, विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी मैदान,उत्तम प्रकारे शौचालय व्यवस्था, परिसरातील जागेत वाचनालयाचे काम लवकरच सुरू करण्यात येणार असून सद्यस्थितीत या शाळेचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलला आहे.

मुख्याध्यापक दिलीप अहिरे, शिक्षक संतोष चाटसे यांसह अन्य शिक्षक वृंद सुध्दा यासाठी मेहनत घेत असून कॅरिंग फ्रेंड्स संस्था मुंबई यांच्या वतीने शाळेच्या छपरावर नुकताच सहा सोलर लावण्यात आले आहेत त्यामुळे विजेची बचत या सोलरमुळे होण्यास मदत होऊ शकते. या अगोदर सुध्दा या कॅरिंग फ्रेंड्स संस्थेच्या माध्यमातून अनेक शालेय उपयोगी साहित्य दिलेले आहे. यासाठी उद्योजक नितीन शहा यांचे मोलाचे योगदान शाळेला मिळत आहे. प्रत्येक वर्गात विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाच्या दृष्टिकोनातून



सुंदर सुंदर चित्रे काढण्यात आली असून बाके सुध्दा रंगीत केली आहेत.

सध्या या शाळेची पटसंख्या १६२ इतकी आहे. इंग्रजी भाषा यायला हवी यासाठी बहुतांश पालकवर्ग मुलांना इंग्रजी शाळेत भरती करत असतात. नगर परिषदेच्या या शाळेत उत्तम प्रकारे शिक्षण मिळत असून अनेक विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात आपल्या कलागुणांना वाव दिलेला आहे. असे असताना देखील मराठी शाळेकडे पालक लक्ष केंद्रित करीत नाहीत. शहराच्या मध्यवर्ती भागात असणाऱ्या या शाळेचे आता पूर्णपणे रुपडे बदलले दिसत आहे.

नगर परिषदेच्या माध्यमातून ही शाळा अधिकाधिक सुंदर व्हावी यासाठी प्रयत्न केले जात आहेत, परंतु येथील पालकांनी, सुज्ञ नागरिकांनी सुध्दा आपल्या परीने खारीचा वाटा उचलून एक सामाजिक बांधिलकी म्हणून या शाळेसाठी सर्वतोपरी योगदान देणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे.

# नागोठणे येथील क्रिकेट स्पर्धेत स्वराज संघ विजेता

**नागोठणे : बातमीदार**

जय हनुमान क्रिकेट क्लब आंगरआळी नागोठणे तर्फ नागोठणे असोसिएशन मर्यादित नाईट बॉक्स अंडआर्म क्रिकेट स्पर्धेचे शनिवारी (दि.२७) नागोठणे कापूर तळा क्रिडांगणावर आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धे मध्ये प्रथम क्रमांक स्वराज नागोठणे, द्वितीय क्रमांक आर. जे. स्टार, तृतीय क्रमांक देवलाई देवी चिकणी व चतुर्थ क्रमांक ओमसाई खडकआळी या संघांनी मिळविला.

या स्पर्धेतील मालिकावीर व सामनावीर म्हणून अतुल बामणे, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून अमेय जोशी, उत्कृष्ट गोलंदाज म्हणून प्रविण पवार व उत्कृष्ट फलंदाज म्हणून वेदांत देवरे या खेळाडूंनादेखील मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.


## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२५ ते २०३० या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नाव व्हि.व्हि एफ. एम्प्लॉईज को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि., ता.पनवेल, जि.रायगड असे असून सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि.३१/१२/२०२५ ते ०६/०१/२०२६, नामनिर्देशन पत्र छाननी दि. ०७/०१/२०२६, नामनिर्देशन पत्र माघारी दि.०९/०१/२०२६ ते २३/०१/२०२६ व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे दिनांक ११/०२/२०२६ रोजी घेण्यांत येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणूकीबाबत सूचना व अधिक माहीती तालुका सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालयामध्ये पहावयास मिळेल, तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

दिनांक : २९/१२/२०२५

**सही/-**
**(सुरेखा पाटील)**
निवडणूक निर्णय अधिकारी


# नियम मोडणाऱ्या चालकांवर कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

रायगड जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत असणारे वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी रविवारी (दि.२८) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २६७ व्यक्तींवर कायदेशीर कारवाई केली. विविध वाहतूकीचे नियम भंग केल्याप्रकरणी त्यांच्याकडून दोन लाख ७७ हजार ४०० रुपये इतका दंड आकारला आहे.


## ग्रुप ग्रामपंचायत कोन, ता. पनवेल, जि. रायगड
## जाहीर नोटीस

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरितसंबंधाचे ग्रुप ग्रामपंचायत कोन प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रुप ग्रामपंचायत कोन कडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या रजिस्टरवर सदर हस्तांतरण करून ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | बिल्डींग क्रमांक | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | -- | ६०५ अ | विल्ला कलेक्शन हौसिंग सोसायटी मु. कोन, पो.अजिवली, ता. पनवेल, जि. रायगड, पिन कोड ४१०२२१ | आर.सी.सी. | कै. अनिल ओबेरॉय | श्रीमती. अंकिता अनिल ओबेरॉय |

**सही**
**श्री.रमेश नामदेव तारेकर**
ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत कोन
ता. पनवेल, जि. रायगड

**सही**
**सौ. अश्विनी जितेश शिसवे**
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत कोन
ता. पनवेल, जि. रायगड



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मुळ जमिन / भुखंड मालक **श्री. सतिश रामचंद्र घरत** यांच्याकडून त्यांच्या मालकी हक्कातील **मौजे जासई, ता. उरण, जि. रायगड** येथील जमिन मिळकतींच्या संपादनाच्या मोबदल्यापोटी मे. सिडकोमार्फत त्यांच्याकडील २२.५ टक्के योजने अंतर्गत **पुष्पक नोड, ता. पनवेल, जि. रायगड** येथे वाटप करण्यात आलेला भुखंड हा ५० : ५० टक्के या तत्वावर विकसीत करण्याकरीता घेतला असून सदर भुखंडाच्या संपूर्ण क्षेत्रापैकी ५० टक्के क्षेत्र हे मे. सिडकोमार्फत नोंदणीकृत त्रिपक्षीय करारनामाव्दारे हस्तांतरीत करुन घेण्याचे ठरविले आहे. त्या भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**भुखंडाचे वर्णन**

| नोड | भुखंड क्र. | सेक्टर | क्षेत्रफळ (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| पुष्पक, ता. पनवेल, जि. रायगड | ५ | २८ | ६८४० चौ. मी. |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील भुखंडांसंदर्भातील समझोता ज्ञापन तथा विकसन करारनामा हा आमचे अशिल आणि वर उल्लेखित जमिन मालक यांच्यामध्ये करण्यात आलेला आहे. तरीही देखील सदरची मिळकत / भुखंड हा निर्बेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या मिळकत / भुखंडावर अन्यथा कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबध असल्यास लेखी पुराव्यानिशी अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत सादर करावे, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदरच्या जमिन मिळकती / भुखंड हा सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असेल आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता आमचे अशील हे सदरहु भुखंडासंदर्भातील व्यवहार पूर्ण करतील. याची नोंद घ्यावी.

कळावे,

दिनांक - २९/१२ /२०२५

**सही/-**
**सही : धनंदा प्रदिप मोकल**
(वकील उच्च न्यायालय)
पत्ता: शॉप नं. १४, शिव चेंबरर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर - ११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे
फोन नं. ९६१९५०५९५८



## जाहीर सूचना

माझ्या पक्षकार श्रीमती दिपांजली योगेश तांडेल, राहणार - मौजे धानकान्हे, ता. रोहा, जि. रायगड, यांच्या वतीने सर्व संबंधित व सर्वसामान्य जनतेस कळवितो की, खालील वर्णन केलेल्या मिळकतीचा शोध अहवाल (Title Search) करण्याच्या अनुषंगाने ही जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**मौजे धानकान्हे, ता. रोहा, जि. रायगड येथील मिळकतीचे वर्णन....**

| सर्व्हे नंबर | गावाचे नाव | भोगवटदाराचे नाव | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी रु.पै |
|---|---|---|---|---|
| ८ | धानकान्हे | दिपांजली योगेश तांडेल | ०.०९.००<br>०.०१.००<br>**०.१०.००** | १.७२ |
| ३६९ | धानकान्हे | दिपांजली योगेश तांडेल | १.४५.९०<br>०.११.६०<br>**१.५७.५०** | १.१४ |
| ३९९ | धानकान्हे | दिपांजली योगेश तांडेल | ०.०३.०० | ०.०५ |
| ४०६ | धानकान्हे | दिपांजली योगेश तांडेल | ०.५१.७०<br>०.०६.५०<br>**०.५८.२०** | ०.४२ |
| ४६० | धानकान्हे | दिपांजली योगेश तांडेल | ७.८१.००<br>१.३७.००<br>**९.१८.००** | ५.६० |
| ३६८ | धानकान्हे | दिपांजली योगेश तांडेल<br>अस्मिता सौरभ तांडेल | ०.४८.०० | १०.९९ |

सदर मिळकतीबाबत कोणास काही हक्क, हिस्सा, दावा, तारण, बोजा, करार, विक्री करार, दानपत्र, बक्षीसपत्र, कर्ज, लीज, भाडेपट्टा, वसीयत, वारसाहक्क किंवा इतर कोणताही दावा / हरकत असल्यास त्यांनी या नोटीसच्या प्रसिद्धीपासून १५ दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर लेखी स्वरूपात आवश्यक पुराव्यांसह कळवावे. वरील मुदतीत कोणताही दावा / हरकत प्राप्त न झाल्यास, सदर मिळकतीबाबत कोणाचाही दावा नाही असे गृहीत धरून पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यात येईल.

दिनांक : ३०/१२/२०२५

**सही/-**
**ॲड. विजयेंद्र बी. शितोळे**
०३, श्री हरेकृष्ण सी.एच.एस., सेक्टर-०५, नवीन पनवेल. ता. पनवेल, जि. रायगड
मो.: ८६५७९७७९४१

# ऐरोली-कळवा एलिव्हेटेड प्रकल्पाला गती; सर्व्हे सुरु

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मागील आठ ते नऊ वर्षांपासून ऐरोली-कळवा एलिव्हेटेड प्रकल्प रखडला आहे. या प्रकल्पाला गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागील महिन्यात बैठक घेतली होती. या प्रकल्पात मुख्य मार्गिकेतून नवी मुंबई आणि ठाणे महापालिकेच्या वेशीवरील भोलानगर येथील बाधित होणाऱ्या ९५० पैकी ३४८ घरांच्या अंतिम सर्व्हेचे काम झाले आहे.

या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांचे बाळकूम येथील निवासी संकुलात 'एमएमआरडीए'कडून पुनर्वसन करण्यात येणार आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून रखडलेल्या ऐरोली-कळवा एलिव्हेटेड प्रकल्पाला गती मिळणार आहे. ठाणे रेल्वेस्थानकातील गर्दीचा भार कमी करण्यासाठी पनवेल-वाशी-कल्याण रेल्वे प्रकल्पासाठी ऐरोली-कळवा एलिव्हेटेड प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. एमआरव्हीसी, एमएमआरडीए, ठाणे महापालिका, रेल्वे मंडळ या प्राधिकरणांकडून हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

या प्रकल्पातील बाधित सावित्रीबाईनगर येथील काही घरांचे पुनर्वसन करण्यात आले,



मात्र त्यापुढील भोलानगर, न्यू शिवाजी नगर, कळवा स्थानक रोड परिसरातून जाणाऱ्या पुलाच्या मार्गिकेतील नागरिकांनी सरसकट पुनर्वसनाची मागणी लावून धरीत हा प्रकल्प रोखून धरला आहे. या पुलाबाबत राज्य सरकारने लक्ष घातले आहे.

या बैठकीत मुंबई रेल्वे विकास मंडळाने भोलानगर येथील नागरिकांच्या पुर्नवसनाचा अहवाल सादर करीत ३४८ घरांच्या सर्व्हेचे काम पूर्ण झाले असून, पुलासाठी आवश्यक असणाऱ्या ३४८ घरांचे पुर्नवसन करण्यासाठी 'एमएमआरडीए'कडे प्रस्ताव पाठवल्याचे स्पष्ट केले होते. त्यानुसार 'एमआरव्हीसी' आणि 'एमएमआरडीए'ने घरांचा सर्व्हे पूर्ण केला तसेच या ठिकाणी बाधितांची नावे प्रकाशित करून हरकती मागवल्या होत्या.

अंतिम सर्व्हेची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर काही नागरिकांनी विरोध दर्शविला असता तरी त्यांनी पूर्व संमती दर्शविल्यानेच त्यांना पुनर्वसन केलेल्या ठिकाणी जावे लागणार असल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले. उर्वरित घरांसाठी 'एसआरए'भोलानगर, न्यू शिवाजी नगर येथील साडेतीन हजार घरांचे 'एसआरए'च्या माध्यमातून राज्य सरकार आणि ठाणे महापालिका पुनर्वसन करणार आहे.

### नागरिकांचे पुनर्वसनही होणार

ठाणे महापालिकेने आमदार, खासदार, माजी लोकप्रतिनिधी आणि भोलानगर रहिवासी संघाच्या मागणीनुसार याबाबतचा प्रस्ताव सरकारकडे पाठवला आहे. त्यामुळे पुलाचे काम सुरू झाल्यावर जीव धोक्यात घालून राहणाऱ्या उर्वरित नागरिकांच्या पुनर्वसनाचादेखील मार्ग मोकळा झाला आहे.

# सहा हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांना निवडणूक प्रशिक्षण

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ पारदर्शक रितीने व सुरळीतपणे पार पाडण्यासाठी निवडणूक प्रक्रीयेत सहभागी सर्व अधिकारी, कर्मचारी यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात येत असून महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ६ हजारहून अधिक कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम वेळापत्रक तयार करण्यात आले आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये २८ प्रभागांमधील १११ जागांकरिता १५ जानेवारी २०२६ रोजी निवडणूक होत असून महापालिका क्षेत्रात ११४८ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आलेली आहेत. निवडणूक प्रक्रियेसाठी मा.राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने ८ विभागांसाठी ८ निवडणूक निर्णय अधिकारी, प्रत्येक विभागासाठी प्रत्येकी ३ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तसेच १८० क्षेत्रीय अधिकारी कार्यरत आहेत.



निवडणूक प्रक्रिया सुनियोजित पध्दतीने पार पाडण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रांवर मतदान केंद्राध्यक्ष, ३ सहाय्यक मतदान अधिकारी, शिपाई अशी पथके तयार करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे अशा प्रकारची राखीव पथकेही ठेवण्यात आली आहेत. या सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे पहिले प्रशिक्षण १ ते ७ जानेवारी या कालावधीत विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी आणि सरस्वती विद्यालय, ऐरोली येथे विभागनिहाय सत्रांमध्ये आयोजित करण्यात आलेले आहे.

१ जानेवारी रोजी नेरुळ विभाग, २ जानेवारी रोजी बेलापूर विभाग, दि.४ जानेवारी रोजी दिघा विभाग, दि.५ जानेवारी रोजी घणसोली विभाग, दि.६ जानेवारी रोजी दोन सत्रात कोपरखैरणे व तुर्भे विभाग, ७ जानेवारी रोजी वाशी विभागातील मतदान केंद्रांसाठी नेमलेल्या मतदान अधिकारी, कर्मचारी यांचे प्रशिक्षण विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी येथे होणार आहे. तसेच ६ जानेवारी रोजी ऐरोली विभागातील मतदान केंद्रांसाठी नेमलेल्या मतदान अधिकारी, कर्मचारी यांचे प्रशिक्षण सरस्वती विदयालय सेक्टर ५ ऐरोली या ठिकाणी होणार आहे.

अशाच प्रकारे दुसऱ्या प्रशिक्षण वर्गाचेही ८ ते १२ जानेवारी या कालावधीतील वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणामध्ये नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांच्या निवडणूक प्रक्रियेतील जबाबदाऱ्या, मतदान साहित्य तपासणी व वितरण, मतदार यादीचा वापर, मतदाराची ओळख पडताळणी, मॉकपोल प्रक्रिया, मतदान यंत्र सिलींग प्रक्रिया, कायदेशीर बाबी अशा निवडणूकीशी संबंधित विविध बाबींची माहिती देण्यात येणार असून विविध शंकांचे निरसनही केले जाणार आहे. त्याचप्रमाणे ईव्हीएम मशीनची प्रत्यक्ष हाताळणी प्रात्यक्षिकही करून घेतले जाणार आहे.

### उपस्थिती बंधनकारक; अन्यथा कारवाई

निवडणूक प्रक्रिया पारदर्शक रितीने पार पाडण्यासाठी व कामकाजात कोणतीही त्रुटी राहू नये आणि गैरप्रकार टाळण्याच्या दृष्टीने या प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात आले असून प्रशिक्षणाची तारीख, वेळ व ठिकाण याची माहिती संबंधित सर्व अधिकारी, कर्मचारी यांना स्वतंत्रपणे कळविण्यात आली आहे. या प्रशिक्षणास उपस्थित राहणे बंधनकारक असून अनुपस्थित राहणाऱ्या व आदेशांचे पालन न करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांच्या विरोधात राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार फौजदारी कारवाई करण्यात येईल नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी स्पष्ट केलेले आहे.

# उरण विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेची आढावा बैठक

**पनवेल : वार्ताहर**

उरण विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेची आढावा बैठक रविवारी (दि.२८) शासकीय विश्रामगृह, डाऊर नगर, उरण येथे नवनियुक्त शिवसेना जिल्हाप्रमुख विनोद साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. या बैठकीस शिवसेनेचे जिल्हा, तालुका, शहर, विभाग, शाखा तसेच विविध आघाड्यांचे पदाधिकारी व असंख्य शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



बैठकीत उपस्थित पदाधिकारी व शिवसैनिकांनी आपल्या-आपल्या भागातील नागरी समस्या, स्थानिक युवकांना नवीन विमानतळ व औद्योगिक प्रकल्पांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, तसेच पक्षसंघटना अधिक बळकट करण्याबाबत सविस्तर चर्चा केली. या वेळी जिल्हाप्रमुख विनोद साबळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, घर तिथे शिवसैनिक आणि गाव तिथे शाखा या संकल्पनेतून शिवसेना संघटना अधिक मजबूत करणे गरजेचे आहे. स्थानिकांच्या प्रश्नांसाठी शिवसेना सदैव रस्त्यावर उतरेल, तसेच कोणत्याही पदाधिकारी किंवा कार्यकर्त्यांना अडचण आल्यास त्यांनी थेट संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले.

या बैठकीस उरण, उलवे, करंजाडे, चिरनेर, चाणजे, केगाव, खोपटे, द्रोणागिरी आदी भागांतील पदाधिकारी, कार्यकर्ते व असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.



**पनवेल : जिल्हा परिषदेच्या सुकापूर येथील शाळेची भाजप अनुसूचित जाती मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अमित जाधव व पाली देवद पंचायत समिती सरचिटणीस उदय म्हसकर यांनी पाहणी केली.**

# रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणतर्फे विधी स्वयंसेवकांसाठी रिफ्रेशर प्रशिक्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग राजेन्द्र सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली विधी



स्वयंसेवकांसाठी रिफ्रेशर ट्रेनिंग कार्यक्रमाचे आयोजन अलिबाग येथे करण्यात आले होते.

समाजातील गरजू वंचित लोकांना मदत करण्यासाठी विधी स्वयंसेवकांनी कायदेविषयक ज्ञान घेऊन त्यांना योग्य ती मदत करणे गरजेचे आहे हा यामागचा उद्देश होता. प्रशिक्षण कार्यक्रमात रायगड जिल्ह्यातील विविध क्षेत्रांत कार्यरत असलेले विधी स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सृष्टी नीलकंठ, जिल्हा न्यायाधीश-१, रायगड यांनी भूषवून उपस्थित स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, मनोगत व प्रशिक्षणाबाबतचे मार्गदर्शन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तेजस्विनी निराळे यांनी केले. या प्रशिक्षण सत्रात ॲड. मनीषा नागावकर, ॲड. उषा पाटील, ॲड. हिना तांडेल, ॲड. तनुष्का पेडणेकर आदी तज्ज्ञ मार्गदर्शकांनी कायद्याच्या विविध पैलूंवर सखोल मार्गदर्शन करून विधी स्वयंसेवकांना अद्ययावत माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पनवेल येथील विधी स्वयंसेवक शैलेश कोंडसकर यांनी केले, तर कार्यक्रमाच्या शेवटी अलिबाग येथील विधी स्वयंसेवक पुनम रांजणकर यांनी आभार मानले.



# तुपगाव येथे वाचनालयाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चौकमध्ये १९२० पासून वाचनालय सुरू आहे. वाचनालय सुरू करून त्याला १०६ वर्षे झालीत. वाचनालयाला ऐतिहासिक वारसा आहे. ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. आज तुपगावमध्ये ओमकार वाचनालय व ग्रंथालय सुरु करून आपण एक उत्तम काम केले आहे. त्याबद्दल सर्वांचे अभिनंदन, असे प्रतिपादन कामगार नेते महेंद्र घरत यांनी तुपगाव-चौक येथे केले. त्यांच्या हस्ते ओमकार वाचनालय व ग्रंथालयाचे रविवारी (दि.२८) उद्घाटन झाले.

माजी सरपंच शांताराम भधे यांनी प्रास्ताविक केले. या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, निखिल ढवळे, देविदास म्हात्रे, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष संतोष बैलमारे, ज्येष्ठ नेते विनायक देशमुख, उद्योजक आप्पा देशमुख, विनोद भोईर, दिनेश गावडे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सुरेश मागावकर यांनी केले.

# पामा ग्लोबल इंटरनॅशनल स्पर्धेत भारताच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पामा ग्लोबल द्वारे आयोजित २३व्या पामा ग्लोबल इंटरनॅशनल स्पर्धेत भारताच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी केली. ही स्पर्धा मलेशियामध्ये २१ डिसेंबर २०२५ रोजी झाली आणि २८ देशांतील ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी त्यात सहभाग घेतला. भारतामधून ४४ विद्यार्थ्यांची निवड या स्पर्धेसाठी करण्यात आली होती.

पामा इंडिया या संस्थेने भारतातून विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी निवडले होते आणि त्या यादीत नवी मुंबई APPL ABACUS (करंजाडे)चे पाच विद्यार्थी सहभागी झाले होते. या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत भारताला अभिमानास्पद




स्थान मिळवून दिले. सर्व विद्यार्थ्यांच्या मेहनतीला फळ आलं आणि त्यात विशेष उल्लेखनीय कामगिरी केली ती विद्यार्थिनी रिधिमा सोराठीया हिने, जिच्या कर्तृत्वामुळे तिने चॅम्पियन क्रमांक जिंकले. त्याचप्रमाणे भुमी पांडुरंग दिंडे प्रथम क्रमांक, अनवेशा अतिश राजेशिर्के दुसरा क्रमांक, यजना युवराज राठोड आणि किमया रोहित कांबळे तृतीय क्रमांक मिळवून यांनी भारताचे आणि करंजाडे शहराचे नाव उज्ज्वल केले.

ही स्पर्धा विद्यार्थ्यांना त्यांच्या बुद्धीमत्तेचा आणि चातुर्याचा योग्य ठिकाणी उपयोग करण्याची संधी देते. या विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षक सोनाली पिंगळे यांच्याकडून विद्यार्थ्यांना मिळालेल्या प्रशिक्षणामुळे त्यांचा आत्मविश्वास आणि कार्यक्षमता वाढली. याशिवाय, त्यांच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या अनुभवामुळे त्यांना भविष्यात आणखी मोठ्या यशाची संधी मिळणार आहे.

# 'सीकेटी'च्या एनएसएस विभागातर्फे विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

युवक : जलसंधारण व पडीक जमिनीचा विकास या संकल्पनेखाली जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने १४ ते २० डिसेंबरदरम्यान कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन, नेरे, तालुका पनवेल याठिकाणी सात दिवसीय विशेष रहिवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिराच्या उद्घाटनावेळी पनवेलचे अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी व सहावे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)आर. एन. चव्हाण आणि मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक प्रा. सुशील शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहिली. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे अध्यक्ष डॉ. राजेश येवले होते.

समारंभाचे अध्यक्ष व संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी सर्व उपस्थित स्वयंसेवकांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच सभोवतालचा परिसर आणि व्यावहारिक ज्ञान अर्जित करण्याचा संदेश दिला.

आभार आरटीसीसीएस. महाविद्यालयाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी केले व सूत्रसंचालन सीकेटी महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.आकाश पाटील यांनी केले. या वेळी कुष्ठरोग निवारण समितीचे कार्याध्यक्ष प्रमोद ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, रायगड जिल्हा परिषद सदस्य भूपेंद्र पाटील, रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, खारघरच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सानवी देशमुख, सीकेटी महाविद्यालयाच्या वाणिज्यशाखेचे शाखाधिपती प्रो.डॉ.एस.बी.यादव, परीक्षा व मूल्यमापन विभागाचे नियंत्रक डॉ. एस. आय. उन्हाळे, महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे पहिले प्रकल्प अधिकारी डॉ. डी. एस. नारखेडे, माजी मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. के. एन.



ढवळे, प्रा. एन. सी. वडनेरे, आणि डॉ. एन.एस. परकाळे, यासोबत माजी कार्यक्रम अधिकारी प्रो. डॉ. ए. के. दीक्षित आदी उपस्थित होते. उद्घाटन समारंभानंतर स्वयंसेवकांचे विविध संघांमध्ये विभाजन करण्यात आले व प्रत्येक संघासाठी एक स्वयंसेवक आणि एक स्वयंसेवीकेची संघनायक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

१५ डिसेंबरपासून शिबिरास सुरुवात झाली. जयवंत गायकवाड यांनी जलसाक्षरता आणि स्वच्छतेच्या माध्यमातून शाश्वत विकास तर डॉ. विशाल गांगर यांनी मानसिक आरोग्य व त्याचे महत्व यावर मार्गदर्शन केले. प्रो. डॉ. एस.बी. यादव यांनी अर्थविषयक जनजागृती केली. ॲड. अरुण पाटील यांनी कायदे क्षेत्रातील करिअरच्या संधी यावर संवाद साधला. १६ डिसेंबरला नेरे परिसर येथे बंधारा बांधला. वाकडी ग्रामपंचायत परिक्षेत्रात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. तानाजी पाटील यांनी जलव्यवस्थापन, अजय घाडगे यांनी डिजिटल साक्षरता आणि सायबर सुरक्षा या विषयांवर अतिथी सत्र झाले. ह. भ.प. संजय महाराज पाटील यांनी अध्यात्माविषयी मार्गदर्शन केले. १७ डिसेंबरला वाकडी येथील अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे आदिवासी शाळेत जावून शाळकरी विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल साक्षरतेबाबत जनजागृती केली. विकास कोम्प्ले यांनी एड्सविषयक जनजागृती तर डॉ. संजय रहाटे यांनी कौशल्य विकास: व्यक्तिमत्वाच्या सर्वांगिक विकासाचे व्यासपीठ याविषयी मार्गदर्शन केले.

१८ डिसेंबरला श्री. भैरवदेव माध्यमिक विद्यालय आणि रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, रिटघर येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले. रश्मी जोशी यांनी शाश्वत विकासाच्या माध्यमातून सर्वांगीण विकास याविषयावर मार्गदर्शन केले. १९ डिसेंबरला स्वच्छता आणि प्लास्टिक बंदी बाबत भव्य रॅली निघाली. रॅलीचे स्वागत नेरे ग्रामपंचायत सरपंच प्रकाश घाडगे, ग्रामसेविका राजश्री पाटील व कर्मचारीवर्गाने स्वागत केले. नेरे प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात स्वच्छता मोहित यशस्वीपणे राबविली. अमित पुंडे (रायगड जिल्हा युवा अधिकारी, युवक कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालय) यांनी सर्व स्वयंसेवकांना माय भारत पोर्टल विषयीची माहिती दिली. यासोबत राष्ट्रीय सेवा योजनेतील माजी स्वयंसेवक संदेश मोरे तथा निलेश पाटील यांनी अनुभवकथन केले. याच दिवशी सीकेटी महाविद्यालाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने कलादर्पण सांस्कृतिक संध्येचे आयोजन करत झुरळ-ए-अख्यान.... या एकांकिकेचा सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख डॉ. गीतिका तंवर, सांस्कृतिक समन्वयक प्रा. गणेश जगताप आणि त्यांच्या चमुने अद्वितीय सादरीकरण केले. २० डिसेंबरला शिबिराचा समारोप डॉ. रोशन पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत तर सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाला. मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील यांनी उपस्थितांसमोर सात दिवसांचा अहवाल सादर केला.

शिबिरासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे अध्यक्ष डॉ. राजेश येवले, मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा. आलोक भानुशाली, प्रा. सुशीलकुमार घाडगे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. भाग्यश्री भोईर, एन.एस. एस. विषयक शिक्षक प्रा. रुपेश माने यांनी विशेष परिश्रम घेतले.

### मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सन्मान

*सात दिवसीय विशेष रहिवासी शिबिरात विशेष कामगिरी बजावणाऱ्या स्वयंसेवकांना प्रदान करण्यात येणाऱ्या पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट शिबिरार्थी म्हणून श्रवण म्हात्रे आणि नेहा घाडगे तथा सर्वोत्कृष्ट नेतृत्व म्हणून मनीष पाटील आणि निशा धनावडे यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यशस्वी आयोजना करिता महत्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गात रोशन रोडपालकर, मिलिंद पाटील, शशिकांत घनसोळकर, विशाल उभारे यांचा सत्कार केला. कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन नेरेचे कार्याध्यक्ष प्रमोद ठाकूर, प्रमुख कार्यवाहक अजय शिर्के, शिबिर प्रमुख नीलकंठ कोळी आदींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.*

# वैद्यकीय तपासणीद्वारे मातृप्रबोधन

## मुरुडमध्ये उपक्रम




**मुरूड : प्रतिनिधी**


मुरूड तालुक्यामधील शिरगाव समाजमंदिराच्या भव्य सभागृहात लायन्स क्लब ऑफ अलिबाग, शासकीय रुग्णालय ठाणे आणि शिरगाव शाळेच्या संयुक्त विद्यमाने फास्टिंग ब्लड शूगर, हिमोग्लोबिन, थायरॉईड तपासणी तसेच महिलावर्गाचे आरोग्यविषयक प्रबोधन करण्यात आले. या वेळी शिरगाव गावातील ४७ महिलांची शूगर, हिमोग्लोबिन आणि थायरॉईड तपासणी करून औषधोपचारासाठी वैद्यकीय सल्ला देण्यात आला.

डॉ. सोनाली मटकर यांनी साठहून अधिक महिलांचे आरोग्यविषयक प्रबोधन करताना चौरस आहारातील पालेभाज्या, मोड आलेली कडधान्ये, कच्च्या भाज्यांचे दैनंदिन आहारातील महत्त्व विशद केले. ठाणे शासकीय रुग्णालयाच्या कार्यालयीन अधीक्षक पूजा राऊत यांनी महिलांचे विविध आजार व संदर्भातील मोफत योजनांची माहिती दिली. शिक्षण विस्तार अधिकारी महेश कवळे यांनी शिरगाव शाळेच्या सामाजिक सहभागाबाबत समाधान व्यक्त केले. मातृप्रबोधनातून मातापालकांना शाळेशी जोडण्याच्या कल्पकतेबाबत मुख्याध्यापक राजेंद्र नाईक आणि प्रियंका पाटील यांचे कौतुक केले. मुरूड गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांनीही उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

या अनोख्या मातृप्रबोधनासाठी अलिबाग लायन्सचे माजी अध्यक्ष अविनाश राऊळ, वळके सरपंच प्रिया म्हात्रे, वैष्णवी खोपकर, मितल नाईक, सामाजिक कार्यकर्ते किशोर काजारे, शाळा व्यवस्थापन समितीचे नंदू चवरकर, महिला मंडळ अध्यक्ष नेत्रा मोरे, ग्रामपंचायत सदस्य पूनम सातामकर, शमिता चवरकर यांच्यासह महिला, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र नाईक यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रियंका पाटील यांनी मानले.

# पेणमधील मृत बिबट्यावर अंत्यसंस्कार

**पेण : प्रतिनिधी**



पेण तालुक्यातील दुष्मी खारपाडा सावरोलीनजीक जाणाऱ्या रेल्वे ट्रॅकवर २७ डिसेंबर रोजी सकाळी एक्स्प्रेसने बिबट्याला धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला होता. त्यानंतर वन विभागाने घटनास्थळी धाव घेत पाहणी करून बिबट्याला पेण वैद्यकीय अधिकारी पी.एन. गायकवाड यांनी तपासून त्याला मृत घोषित केले होते. त्यानुसार मृत बिबट्याचे शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर मृत बिबट्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

दुष्मी खारपाडा या भागातून जाणाऱ्या रेल्वे ट्रॅकवर बिबट्याचा मृत्यू झाला होता. त्यानंतर मृत बिबट्याची तपासणी करण्यात आली होती. त्या वेळी बिबट्या हा नर जातीचा व पाच वर्षांचा असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्याचे वजन ४० किलो होते. वैद्यकीय अधिकारी डॉ. गायकवाड यांनी मृत बिबट्याचे शवविच्छेदन करून त्याच्यावर लाडवली राखीव वन सर्वे (रोपवाटिका) नंबर ३५मध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली अग्नी देण्यात आला.

या वेळी रायगड जिल्हा उपवनसंरक्षक अधिकारी राहुल पाटील, सहाय्यक उपवनसंरक्षक पनवेल सागर माळी, परिमंडल वन अधिकारी बालाजी आडे, सचिन मोरे, वनरक्षक सुहास राऊत, राजेश साबळे, वसंत पोइलकर, रुदास बिज, निशा उके, राजेश गायकवाड, शेखर कुवर ढगे, शिल्पा जाधव, सागर कडू, रोहित घुटे, सुप्रिया पाईकराव आदी वन कर्मचारी उपस्थित होते.

# माणगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशींना सेवानिवृत्तपर निरोप

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

माणगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी यांनी प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्ती स्वीकारली. त्यांच्या निरोप समारंभावेळी संपूर्ण वातावरण भावनांनी ओथंबून गेले होते. पोलीस अधिकारी, कर्मचारी, व्यापारी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी तसेच सर्वसामान्य नागरिकांनी मनापासून कृतज्ञता व्यक्त करत त्यांना सेवानिवृत्तीपर निरोप दिला.

माणगाव शहरातील महामार्गावरील आंदोलन, अनधिकृत बांधकामे, वाहतूक कोंडी, अपघातांची वाढ, अवैध धंदे,जातीय सलोखा तसेच शांतता व सुव्यवस्था राखण्यासारख्या संवेदनशील विषयांवर सूर्यवंशी यांनी अतिशय समतोल आणि जबाबदारीने कामगिरी बजावली. त्यामुळेच माणगावकरांच्या मनात त्यांनी विश्वासाचे आणि सुरक्षिततेचे स्थान निर्माण केले.

निरोप समारंभ माणगाव तालुका रिक्षा चालक व मालक संघटनेचे अध्यक्ष संजय साबळे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी विविध खात्यांचे अधिकारी, महसूल विभागाचे प्रतिनिधी, पोलीस पाटील, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब दळवी, रिक्षा संघटनांचे पदाधिकारी, नातेवाईक, मित्रमंडळी तसेच पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# साळावच्या जिंदल विद्यामंदिरात स्नेहसंमेलन

**मुरूड : प्रतिनिधी**



साळाव येथील जिंदल विद्यामंदिरात नुकतेच शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन ‘युग मंथन’ या अर्थपूर्ण व विचारप्रवर्तक थीमवर मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. या कार्यक्रमातून मानवी संस्कृतीचा कालातीत प्रवास सतयुग, त्रेतायुग, द्वापारयुग व कलियुग या चार युगांच्या माध्यमातून अत्यंत कलात्मक आणि प्रभावी पद्धतीने सादर करण्यात आला.

या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक, निलू मलिक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याचप्रमाणे डीजीएम इलेक्ट्रिकल व इन्स्ट्रुमेंटेशनचे जितेंद्र आचार्य आणि सुनील लोणकर हे मान्यवर विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

या वेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक नृत्याविष्कार, भावपूर्ण नाट्यप्रयोग आणि आशयपूर्ण लघुनाट्यांच्या माध्यमातून प्रत्येक युगातील मूल्यव्यवस्था, संघर्ष आणि सामाजिक बदल प्रभावीपणे उलगडण्यात आले. यामधील आई–वडिलांचा सन्मान व त्यांची काळजी घेण्यावर आधारित लघुनाट्य विशेष भावस्पर्शी ठरले. वृद्धाश्रमांकडे वळणाऱ्या वाढत्या प्रवृत्तीवर भाष्य करत या सादरीकरणाने उपस्थित पालक व मान्यवरांच्या डोळ्यांत पाणी आणले.

स्त्री सक्षमीकरणावर आधारित सादरीकरणही विशेष प्रभावी ठरले. विविध युगांतील स्त्रीचे स्थान, तिची ताकद, स्वाभिमान व आत्मनिर्भरतेचा प्रवास या सादरीकरणातून प्रभावीपणे मांडण्यात आला. समानता, स्वावलंबन व सामाजिक प्रगतीसाठी स्त्री सशक्तीकरणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्राचार्य मुकेश ठाकूर यांनी शाळेच्या शैक्षणिक दृष्टीकोनावर प्रकाश टाकला. मजबूत मूल्यांवर आधारित जागतिक नागरिक घडवणे हेच शाळेचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले. परंपरा आणि परिवर्तन यांचा समतोल राखत शिक्षण दिले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले आणि विद्यार्थ्यांनी सामाजिक संदेश मांडण्यासाठी रंगमंचाचा प्रभावी वापर केल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

प्रमुख पाहुणे व विशेष अतिथींनी कार्यक्रमाच्या संकल्पनेचे विशेष कौतुक करत विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण व परिणामकारक सादरीकरणाचे अभिनंदन केले तसेच अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडतो, असे मत व्यक्त केले.

# सुधागडात ओरिगामी सत्र; ४५० विद्यार्थ्यांचा सहभाग



**सुधागड : रामप्रहर वृत्त**

उर्मी संस्था आणि प्राज फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सुधागड तालुक्यातील विविध शाळांमध्ये ओरिगामी सत्रांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात सुमारे ४०० ते ४५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

या सत्रांत जागृती हायस्कूल नाडसूर, शारदा विद्यालय पेडली, आश्रमशाळा वावळोली, चिवे, माध्यमिक विद्यालय खवली आणि स्वामी विवेकानंद हायस्कूल मजरे जांभूळपाडा या शाळांचा समावेश होता. प्रत्येक शाळेत ओरिगामी सत्र आनंदी आणि सर्जनशील वातावरणात पार पडले.

कार्यक्रमाची सुरुवात शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली झाली. विद्यार्थ्यांना कागदापासून फुलं, पक्षी, होड्या, मुकुट, घर अशा विविध सुंदर आकृत्या तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. रंगीत कागदांच्या साहाय्याने विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पनाशक्तीला वाव देत आकर्षक कलाकृती साकारल्या.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये हाताची सफाई, एकाग्रता, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास यांना चालना मिळाली. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःची कलाकृती सादर करताना आनंद व्यक्त केला. तयार झालेल्या कलाकृतींचे वर्गात प्रदर्शनही लावण्यात आले.

कार्यक्रमाचे मार्गदर्शन केळकर यांनी केले. याचे नियोजन उर्मी संस्थेच्या अध्यक्ष रेश्मा शेंडे, कार्यक्रम व्यवस्थापक रश्मी सकपाळ आणि संतोष शिंदे यांनी केले. सर्व शाळांतील मुख्याध्यापक व शिक्षकांनी उर्मी संस्थेचे विशेष आभार मानले आणि अशा उपक्रमांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला हातभार लागतो, असे मत व्यक्त केले. शेवटी शिक्षकांनी ओरिगामी ही केवळ एक कला नसून बौद्धिक आणि भौमितिक विकासासाठी उपयुक्त साधन असल्याचे सांगत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या सत्रामुळे शाळांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

# खरे महाराजांची गुरूपूजा



**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील लाखोले येथे तुकाराम रामदास म्हात्रे यांच्या राहत्या घरी दरवर्षीप्रमाणे खरे महाराज यांची ५१वी गुरुपूजा झाली. यानिमित्त भाल येथील पुरोहित राजू भिडे यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. त्यानंतर पूजेचा कार्यक्रम झाला.

आंबेगावचे हभप दत्तात्रयमहाराज ढेरे यांनी आपले योगदान न घेता सेवाभावाने खरे महाराजांवर प्रवचन केले. वढाव, वाशी, दिव व पंचक्रोशीतील भाविक उपस्थित होते.

या वेळी गावातील विद्यार्थिनी क्षितिजा सुनील म्हात्रे हिने चित्रकला, खो–खो, कबड्डीत बक्षिसे मिळविल्याबद्दल तिचे प्रवचनकार ढेणे महाराजांच्या हस्ते प्रोत्सहनपर बक्षीस देऊन गौरव करण्यात आला. यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# कुणबी समाज वधू–वर परिचय मेळाव्याला प्रतिसाद




**धाटाव : प्रतिनिधी**

कुणबी समाजोन्नती संघ, मुंबई संलग्न ग्रामीण शाखा रोहा यांच्या वतीने माजी आमदार स्व. पा. रा. सानप कुणबी भवन, रोहे येथे नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या कुणबी वधू–वर परिचय मेळाव्यास समाजबांधव व भगिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या मेळाव्याचे उद्घाटन रोहा तालुका अध्यक्ष रामचंद्र सकपाळ यांच्या हस्ते करण्यात आले. मेळाव्यास जिल्हा अध्यक्ष शिवराम महाबळे, उपाध्यक्ष शंकर भगत, रोहा नगर परिषदेचे नवनिर्वाचित नगरसेवक व कुणबी समाज नेते रवींद्र चाळके, रोहा तालुका उपाध्यक्ष रघुनाथ करंजे, खजिनदार सुहास खरीवले, सरचिटणीस मोरेश्वर खरीवले, मेढा ग्रुप अध्यक्ष निवास खरीवले, धाटाव ग्रुप अध्यक्ष दिनेश रटाटे, कोलाड ग्रुप अध्यक्ष राजेश कदम, सानेगाव ग्रुप अध्यक्ष खेळू ढमाळ, चणेरा ग्रुप अध्यक्ष पांडुरंग कोंडे, मुंबई विवाह मंडळ सदस्य वसंत मरावडे, गोपीनाथ गंभे, ज्ञानेश्वर दळवी, कोलाड सचिव प्रसाद सानप, रोहा तालुका महिला अध्यक्ष दीपिका भगत आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी शंकर भगत यांनी आपले विचार मांडताना सांगितले की, आज विवाह जुळवताना माता–पित्यांची मोठी दमछाक होत आहे, तर रामचंद्र सकपाळ यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, समाजासाठी आयोजित करण्यात आलेल्या या वधू–वर परिचय मेळाव्यामुळे तळागाळातील समाजघटकांच्या हिताची बांधिलकी जपली जाते. विवाह जुळवताना अनेक अडचणी येत असून मुलीकडील अपेक्षा–स्वतःचे शहरातील घर, मोठे पगार पॅकेज–यामुळे अनेक विवाह रखडत आहेत. या अवास्तव अपेक्षांना कुठेतरी मर्यादा घालण्याची गरज आहे, असेही त्यांनी नमूद केले.

या मेळाव्यात नवनिर्वाचित नगरसेवक रवींद्र चाळके यांचा रोहा तालुका कुणबी समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

वधू–वर परिचय मेळावा यशस्वी करण्यासाठी सतीश भगत, शैलेश बाईत, रवींद्र शिंदे, महेश तुपकर, दिनेश भगत, प्राची राऊत, जिज्ञासा तुपकर, सपना रटाटे यांनी परिश्रम घेतले.

# जांभिवली केंद्रावर वनवासी कल्याण आश्रमाचा स्थापना दिन उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत तालुक्यातील जांभिवली येथील केंद्रावर वनवासी कल्याण आश्रम स्थापना दिन हा वनवासी कल्याण आश्रम डोंबिवली तर्फे साजरा करण्यात आला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ डोंबिवली प्रताप प्रभात प्रौढ शाखेचे स्वयंसेवक व मुंबई महानगर कार्यकर्त्यासमवेत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

केंद्र प्रमुख ईश्वर चौधरी यांनी सर्वांचे स्वागत केले. राष्ट्रपती पारितोषिक विजेत्या व वनवासी कल्याण आश्रम कोकण प्रांताच्या माजी अध्यक्ष ठमाताई पवार आणि अजित धोंड यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. चौधरी यांनी जांभिवली केंद्र विद्यार्थी वसतिगृहाबद्दल व तेथील दिनचर्येची माहिती दिली तसेच वनवासी कल्याण आश्रम वेगवेगळ्या १४ आयामांद्वारे वनवासी समाजात अखिल भारतीय स्तरावर काम कसे करते व त्यांचा त्यांचा सर्वांनी सर्वांगीण विकास कसा करते. ते सांगितले. ठमाताईंनी ’तू मनुष्य बड़ा है महान’ या पद्याने सर्वांना मंत्रमुग्ध केले.

ठमाताईंनी कल्याण आश्रमच्या कार्यात प्रवेश करून वयाच्या तिसाव्या वर्षी त्या वनवासी कल्याण आश्रमाच्या जांभिवली वस्तीगृहाचे केंद्रप्रमुख कुंटे उभयतांकडून लिहायला, वाचायला शिकल्या आणि एवढ्यावर न थांबता त्यांनी पाड्यापाड्यावर शिक्षणाचे महत्व पटवून देण्यासाठी बालवाड्या सुरू केल्या. त्यामुळेच मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण झाली. ठमाताई आपल्या मुलांना काय शिकवितात हे पहायला त्यांच्या आयाही येऊ लागल्या. मग ठमाताईनी पाड्यावर बायकांना जमवून त्यांच्याशी गप्पा मारून त्यांनाही शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. त्यातूनच बचत गट सुरू झाले, अशी माहिती उपस्थित कार्यकर्त्यांना दिली.

अजित धोंड यांनी, मुंबई पोर्ट ट्रस्टमधील कार्यकर्त्यांनी खेलकूद, शैक्षणिक प्रकल्प असो त्यामुळे मोरगासारखा धावपटू तयार होण्यासाठी योगदान लाभले, असे सांगितले. हेमंत वरळीकर यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत वनवासी कल्याण आश्रम या सेवेची सुरुवात कोठिंबा या केंद्रावरुन प्रमोद करंदीकर यांच्या मार्गदर्शनाखाली चंदू जोशी, अजित धोंड यांच्यासारख्या तरुण कार्यकर्त्यांच्या रूपाने झाल्याचे सांगितले.

या कार्यक्रमास भारती मुकादम, लता वरळीकर, रमण वरळीकर आदी उपस्थित होते. सुहास वाळके यांनी सर्वांचे आभार मानले.



**श्रीवर्धन : दिवेआगर समुद्र किनाऱ्यावरील सूर्यास्ताचे अमेय नाझरे यांनी टिपलेले छायाचित्र.**

# वूमन्स इंडियाचा विजयी चौकार

## श्रीलंकेविरुद्ध मालिकेत ४-०ने अभेद्य आघाडी

**तिरुवनंतपूरम : वृत्तसंस्था**

स्मृती मानधना (८०) आणि शफाली वर्मा (७९) यांची १६२ धावांची विक्रमी सलामी आणि फिरकीपटू वैष्णवी शर्माच्या (२/२४) प्रभावी गोलंदाजीच्या जोरावर भारतीय महिला संघाने चौथ्या टी-२० सामन्यात श्रीलंकेचा ३० धावांनी पराभव केला. या विजयासह भारताने पाच सामन्यांच्या मालिकेत ४-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे.

स्मृती आणि शफाली यांनी पहिल्या विकेटसाठी १६२ धावांची विक्रमी भागीदारी करत भारताला २ बाद २२१ या सर्वोच्च धावसंख्येपर्यंत पोहचवले. स्मृती-शफाली यांच्यात झालेली १६२ धावांची सलामीची भागीदारी ही भारतासाठी कोणत्याही विकेटसाठी झालेली सर्वोच्च भागीदारी ठरली आहे. या जोडीने २०१९मधील वेस्ट इंडिजविरुद्धचा (ग्रॉस इस्लेट)



१४३ धावांच्या भागीदारीचा आपलाच विक्रम मोडला, तर २२१ ही भारतीय महिला संघाची टी-२०मधील सर्वोच्च धावसंख्या आहे. स्मृती, शफालीखेरिज रिचा घोषने अवघ्या १६ चेंडूंमध्ये नाबाद ४० धावा कुटताना २५०च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी केली.

प्रत्युत्तरात २२२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेला २० षटकांत ६ बाद १९१ धावापर्यंत मजल मारता आली. हसिनी परेरा (२० चेंडूंत ३३ धावा) आणि कर्णधार चमारी अटापट्टू (३७ चेंडूंत ५२ धावा) यांनी फटकेबाजी करत डावाला गती दिली, मात्र मधल्या फळीतील फलंदाज ढेपाळल्याने श्रीलंकेचा डाव कोलमडला.

भारताच्या वैष्णवी शर्माने चार षटकांत केवळ २४ धावा देत दोन महत्त्वपूर्ण बळी मिळवले. तिने सेट झालेल्या चमारी अटापट्टू व हर्षिता समरविक्रमा (२०) यांना बाद करून सामन्याचे चित्र बदलले. वेगवान गोलंदाज अरुंधती रेड्डीने ४२ धावांत दोन बळी घेत वैष्णवीला चांगली साथ दिली. मालिकेतील पाचवा आणि अंतिम टी-२० सामना मंगळवारी (दि. ३०) आहे.

## स्मृती मानधना बनली १० हजारी मनसबदार

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय महिला क्रिकेट संघाची स्टार सलामीवीर स्मृती मानधना हिने रविवारी क्रिकेट जगतात एक नवा इतिहास रचला.



श्रीलंकेविरुद्धच्या चौथ्या टी-२० सामन्यात धडाकेबाज फलंदाजी करत स्मृतीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १० हजार धावांचा टप्पा ओलांडला. हा टप्पा गाठणारी ती जगातील चौथी आणि भारताची दुसरी महिला क्रिकेटपटू ठरली आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये केवळ मिताली राज (भारत), शार्लेट एडवर्ड्स (इंग्लंड) आणि सुझी बेट्स (न्यूझीलंड) या तिघींनाच १० हजार धावांचा टप्पा ओलांडता आला आहे. त्यापाठोपाठ आता स्मृती मानधना हिने या यादीत स्थान मिळवले आहे.

# करंजाडेत व्हॉलीबॉल स्पर्धा रंगली



**पनवेल : वार्ताहर**

स्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त करंजाडे येथे छत्रपती स्पोर्ट्स क्लबच्या वतीने व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत आठ संघांनी सहभाग घेऊन रोमांचक कामगिरी केली.

करंजाडेतील सात आणि मुंबईतील वांद्रे येथील एक अशा एकूण आठ संघांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. सुरुवात केलेल्या संघांनी शेवट करून प्रथम आणि द्वितीय क्रमांक मिळवला. छत्रपती स्पोर्ट्स क्लब १ आणि हॉलिडे पँथर्स या संघातील अंतिम सामना चुरशीचा झाला. प्रथम, द्वितीय संघाला रोख पारितोषिक व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले तसेच इतर संघांना ट्रॉफी देण्यात आली. प्रवीण बनकर सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरला. त्यालाही गौरविण्यात आले व सर्व संघांच्या खेळाडूंना शुभेच्छा देण्यात आल्या.

करंजाडे भागातील तरुणांना खेळाकडे आकर्षित करणे, राष्ट्रीय भावना, शिस्त आणि आरोग्यपूर्ण जीवनशैली रुजविणे हा या उपक्रमातील उद्देश असल्याचे प्रथमेश पुंडे यांनी या वेळी सांगितले.



# पेण येथे कराटे बेल्ट परीक्षेस प्रतिसाद

**पेण : प्रतिनिधी**

पेण येथे युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशन इंडिया या संस्थेच्या वतीने पेणमधील नगरपालिका मैदानात यलो बेल्ट ते ब्लॅक ब्राऊन बेल्टपर्यंतच्या विद्यार्थ्यांची बेल्ट टेस्ट घेण्यात आली. यामध्ये ९८ विद्यार्थी परीक्षेस बसले होते.

युनाइटेडचे शोतोकान कराटे असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. मंदार पनवेलकर, उपाध्यक्ष रवींद्र म्हात्रे यांच्या उपस्थितीत ही परीक्षा घेण्यात आली. या वेळी मुख्य परीक्षक ओसेन्साय विनायक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सेन्साय निलेश ओव्हाळ, प्राजक्ता तेटमे, अयुष पाटील, स्वरांगी घैसास, रितुल म्हात्रे, हर्षाली पेणकर, महंमद अली, आयुष रसाळ, आयेशा बेगम, भक्ती भानुसकर, रितेश पवार, दीपेश जाधव, पार्थ निकम, ओजस म्हात्रे, आर्यन म्हात्रे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. उत्तीर्ण विद्यार्थांना बेल्ट व सर्टिफिकेट देऊन सन्मानित करण्यात आले.

## महाराष्ट्राच्या रामकृष्ण घोषच्या हिमाचलविरुद्ध सात विकेट्स

**जयपूर : वृत्तसंस्था**

देशांतर्गत क्रिकेटमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणारा रामकृष्ण घोषने विजय हजारे ट्रॉफीत गोलंदाजी करताना दमदार कामगिरी केली आहे. या स्पर्धेत हिमाचल प्रदेश संघाविरूद्ध खेळताना पठ्ठ्याने सात गडी बाद करून सर्वांचे लक्ष वेधून घेतलं आहे. या दमदार गोलंदाजीच्या बळावर महाराष्ट्र संघाने हिमाचल प्रदेश संघाला पहिल्या डावात २७१ धावांवर रोखले.

या सामन्यात महाराष्ट्र संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय महाराष्ट्राच्या गोलंदाजांनी योग्य ठरवला. हिमाचल प्रदेश संघाकडून खेळताना पुखराज मनने १११ चेंडूंचा सामना करत ११० धावांची दमदार खेळी केली, पण त्याला इतर कुठल्याही फलंदाजाकडून साथ मिळाली नाही. महाराष्ट्राकडून गोलंदाजी करताना रामकृष्ण घोषने अंकित कलसी, एकांत सेन, इनेश महाजन, पुखराज मन, नितीन शर्मा, वैभव अरोरा आणि रोहित कुमार यांना बाद करत माघारी धाडले. यादरम्यान त्याने ९.४ षटकात अवघ्या ३० धावा खर्च केल्या आणि सात गडी बाद केले.

आयपीएल २०२५ स्पर्धेसाठी झालेल्या लिलावात चेन्नई सुपर किंग्जने रामकृष्ण घोषला ३० लाखांच्या मूळ किमतीत आपल्या संघात स्थान दिले होते. सीएसकेने त्याला ३० लाखात रिटेन केले. आगामी हंगामात त्याला पदार्पणाची संधी दिली जाऊ शकते.

## इंग्लंडचा बॉलर एटकिंसन अ‍ॅशेस मालिकेतून बाहेर

**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या अ‍ॅशेस मालिकेतील शेवटच्या सामन्याआधी इंग्लंडला मोठा धक्का बसला आहे. संघातील प्रमुख वेगवान गोलंदाज गस एटकिंसन हॅमस्ट्रिंगच्या दुखण्यामुळे पाचव्या कसोटीतून बाहेर पडला आहे.

मेलबर्नच्या मैदानावर झालेल्या बॉक्सिंग डे कसोटीतील दुसऱ्या दिवशी एटकिंसन लंगडताना दिसून आला होता. त्यानंतर सोमवारी स्कॅन करण्यात आले. त्याच्या पायाला दुखापत आहे. त्यामुळे तो अधिकृतरित्या या मालिकेतून बाहेर पडला आहे. त्याच्या जागी बदली खेळाडूची घोषणा करण्यात आलेली नाही. याआधी इंग्लंडचे मार्क वूड आणि जोफ्रा आर्चरदेखील दुखापतीमुळे बाहेर झाले आहेत.

## स्मृती मानधना-शफाली वर्माचा महाविक्रम

### टी-२० क्रिकेटमध्ये तीन हजारपेक्षा जास्त धावांची भागीदारी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय महिला क्रिकेट संघाची नंबर १ जोडी स्मृती मानधना आणि शफाली वर्मा यांनी क्रिकेटच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी आपले नाव कोरले. श्रीलंकेविरुद्धच्या चौथ्या टी-२० सामन्यात या जोडीने केवळ भारताला विजय मिळवून दिला नाही, तर टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये तीन हजारपेक्षा जास्त धावांची भागीदारी करणारी जगातील पहिली जोडी ठरली आहे.

थिरुवनंतपुरम येथील ग्रीनफिल्ड स्टेडियमवर पार पडलेल्या या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेच्या गोलंदाजांच्या नाकी नऊ आणले. स्मृती मानधना (८० धावा) आणि शफाली वर्मा (७९ धावा) यांनी पहिल्या विकेटसाठी अवघ्या १५.२ षटकांत १६२ धावांची जबरदस्त सलामी दिली. ही भारतासाठी कोणत्याही विकेटसाठी केलेली सर्वोच्च भागीदारी ठरली. या खेळीदरम्यान या जोडीने तीन हजारांहून अधिक धावांची भागिदारी रचली. या जोडीच्या नावावर एकूण ३१०७ धावा आहेत. यापूर्वी हा विक्रम ऑस्ट्रेलियाच्या एलिसा हिली आणि बेथ मुनी २,७२० धावा यांच्या नावावर होता.

# ‘एमसीए’च्या स्पर्धेतील मुलींचे सामने होणार रायगडात

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए)च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १९ वर्षाखालील मुलींच्या एकदिवसीय ५० षटकांच्या क्रिकेट स्पर्धेतील १५ सामन्यांचे आयोजन रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)मार्फत जिल्ह्यातील विविध मैदानांवर २९ डिसेंबर ते ४ जानेवारीदरम्यान करण्यात येत आहे.



छत्रपती शिवाजी महाराज मैदान पेण, छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण गव्हाण-उलवे नोड आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटी मार्केट्स ग्राउंड रसायनी-पाताळगंगा अशा तीन मैदानावर हे सामने खेळवले जाणार आहेत. एमसीएच्या ग्रुप ’जी’मध्ये सहा संघांचा समावेश असणार आहे. त्यात आरडीसीएच्या मुलींच्या संघासह सातारा जिल्हा क्रिकेट असोसिएशन, सिंधुदुर्ग जिल्हा क्रिकेट असोसिएशन, चंद्रोस क्रिकेट क्लब पुणे, बास क्रिकेट क्लब पुणे, ज्यूडिशियल क्रिकेट अकॅडमी पुणे संघांचा समावेश असणार आहे.

### ‘आरडीसीए’चा संघ जाहीर


स्पर्धेच्या पहिला दोन सामन्यांसाठी आरडीसीएच्या मुलींचा संघ जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये स्वरा खेडेकर (कर्णधार), गार्गी साळुंके, भ्रताती राय, काव्या धावडे, स्वरा बामुगडे, तनश्री सावंत, वेदिका तेटगुडे, संस्कृती पालकर, कनक यादव, दिव्यांका धनावडे, प्रचिती जाधव,किमया कदम,समिधा तांडेल,स्वरा भगत, निशिता विठ्ठलानी राखीव खेळाडू तनिष्का वार्गे, रशिता डे, आरुषी जाधव, अनिषा वर्मा, मधुरा बाबर, श्रुती अग्री, वेदश्री शेळके, शुभांगिनी दास यांचा समावेश आहे. या संघाला आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# विजय हजारे ट्रॉफीतून विराट-रोहित बाहेर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विजय हजारे ट्रॉफी २०२५-२६मध्ये सोमवारी (दि. २९) तिसऱ्या फेरीचे सामने खेळले गेले, मात्र या फेरीत विराट कोहली आणि रोहित शर्मा अनुक्रमे दिल्ली आणि मुंबईकडून मैदानात दिसले नाहीत. दिल्लीचा सामना अलूर येथील केएससीए स्टेडियमवर सौराष्ट्रविरुद्ध झाला, तर मुंबईचा संघ जयपूरच्या जयपूरिया विद्यालय मैदानावर छत्तीसगडविरुद्ध खेळायला उतरला.

विराट कोहलीने दिल्लीसाठी खेळलेल्या दोन सामन्यांत शानदार कामगिरी केली. त्याने आंध्र प्रदेशविरुद्ध १३१ आणि गुजरातविरुद्ध ७७ धावांचे योगदान दिले. दुसरीकडे रोहित शर्माने सिक्कीमविरुद्ध १५५ धावांची धडाकेबाज खेळी केली, पण



उत्तराखंडविरुद्धच्या सामन्यात तो पहिल्याच चेंडूवर बाद झाला.

आता प्रश्न असा आहे की, विराट आणि रोहित तिसऱ्या फेरीत का खेळले नाहीत? खरंतर रोहित आणि कोहली या स्पर्धेत केवळ मर्यादित सामने खेळण्यास सहमत झाले होते. या दोन्ही खेळाडूंनी केवळ दोन सामने खेळण्याचे आश्वासन दिले होते. विराट आणि रोहित स्पर्धेच्या पहिल्या दोन सामन्यांत आपापल्या संघांसाठी खेळायला उतरले होते.

आता विराट कोहली आणि रोहित शर्मा यांना या स्पर्धेत आणखी सामने खेळायचे आहेत की नाही हे पूर्णपणे त्यांच्यावर अवलंबून आहे. ११ जानेवारीपासून भारताला न्यूझीलंडविरुद्ध मायदेशात तीन सामन्यांची वनडे मालिका खेळायची आहे. त्यामुळे या दोन्ही खेळाडूंचे लक्ष त्या आंतरराष्ट्रीय मालिकेवर असणार आहे.

‘क्रिकबझ’च्या अहवालानुसार, विराट ६ जानेवारी रोजी रेल्वेविरुद्ध होणाऱ्या सामन्यात दिल्लीकडून पुन्हा एकदा खेळू शकतो, मात्र रोहित आता विजय हजारे ट्रॉफीमध्ये मुंबईसाठी पुढे खेळणार नाही, असेही या अहवालात म्हटले आहे.

# चार ओव्हर्स, सात रन्स आणि आठ विकेट्स

## भुतानच्या गोलंदाजाचा विश्वविक्रम



**गेलेफु (भूतान) : वृत्तसंस्था**

क्रिकेटच्या छोट्या फॉरमॅटमध्ये गोलंदाजांचा निभाव लागणे खूपच कठीण असते, पण याच छोट्या फॉरमॅटमध्ये एक मोठा विक्रम प्रस्थापित झाला आहे. क्रिकेटच्या ज्या प्रकारात फोर विकेट हॉलची कामगिरी सर्वोत्तम मानली जाते तिथे एका गोलंदाजाने आठ विकेट्स घेत इतिहास रचला आहे. हा विक्रम आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यात नोंदवला गेल्यामुळे क्रिकेट जगात याची जोरदार चर्चा रंगताना पहायला मिळत आहे.

भूतान आणि म्यानमार यांच्यातील आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यात छोट्या फॉरमॅटमधील सर्वोत्तम गोलंदाजीचा नवा विक्रम प्रस्थापित झाला आहे. भूतानच्या संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना १२७ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना म्यानमारचा संघ अवघ्या ४५ धावांत आटोपला. भूतानच्या ताफ्यातील सोनम येशेची याने ऐतिहासिक कामगिरी करताना चार षटकाच्या कोट्यात आठ विकेट्स आपल्या खात्यात जमा केल्या. यासाठी त्याने फक्त सात धावा खर्च केल्या.

२२ वर्षीय सोनम येशे हा या कामगिरीसह आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये आठ विकेट्स हॉल घेणारा पहिला गोलंदाज ठरला आहे. याआधी पुरुष आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यात दोन गोलंदाजांनी प्रत्येकी सात विकेट्स घेतल्या होत्या. मलेशियाच्या स्याझरुल इद्रुस याने २०२३मध्ये चीनविरुद्धच्या सामन्यात, तर बहरीनच्या अली दाऊद याने भूतानविरुद्ध सात विकेट्सचा डाव साधला होता.

## आई-वडिलांचा आशीर्वाद घेत यशस्वीने साधेपणाने साजरा केला वाढदिवस

**नागपूर :** भारताचा सलामीवीर यशस्वी जयस्वाल हा २८ डिसेंबरला २४ वर्षाचा झाला. त्याने यंदाचा वाढदिवस हा आपल्या कुटुंबासमवेत अत्यंत साध्या पद्धतीने साजरा केला.



यशस्वी जयस्वालला भारतात होणाऱ्या टी-२० वर्ल्डकप २०२६च्या संघात संधी मिळालेली नाही, मात्र न्यूझीलंडविरूद्ध होणाऱ्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी त्यांची निवड होण्याची शक्यता आहे. दरम्यान, टीम इंडियातील दिग्गज खेळाडू विजय हजारे ट्रॉफी खेळून ती गाजवत असताना यशस्वी मात्र या स्पर्धेतील पहिल्या तीन सामन्यांना मुकला. फूड पॉईजनिंग झाल्यामुळे त्याला मुंबईकडून पहिले तीन सामने खेळता आले नाहीत. आता तो पूर्णपणे फिट झाला असून तो ३१ डिसेंबर रोजी गोव्याविरूद्धच्या सामन्यात मुंबईकडून खेळणार आहे.

यशस्वीने आपला २४वा वाढदिवस कुटुंबासमवेत साजरा केला. केक कापून तो आधी आई वडिलांना भरवला. त्यानंतर त्यांना नमस्कार करून आशीर्वाद घेतला.

# एकहाती झेल घेत चाहता बनला कोट्यधीश!

**केपटाऊन : वृत्तसंस्था**

एखादा सामना पाहण्याठी थेट स्टेडियम गाठणाऱ्या चाहत्यांची सर्वसाधारण अपेक्षा हीच असते की, सामन्यात उत्तम जुगलबंदी रंगावी आणि आपल्या संघाच्या गळ्यात यशश्रीची माळ पडावी. एमआय केपटाऊन आणि डर्बन सुपर जायंटस् लढतीचाही याला अपवाद नव्हता. हजारो चाहते येथे सामन्याचा आनंद लुटण्यासाठीच स्टेडियममध्ये पोहोचले होते, पण याच लढतीत गॅलरीतील या चाहत्याचे नशीब चांगलेच फळफळले.

याचे कारण म्हणजे या चाहत्याने स्टँडसमध्ये टिपलेला रिकेल्टनचा एकहाती क्लीन कॅच आणि यासाठी त्याला मिळालेले चक्क १.७ कोटींचे रोख इनाम! या एका झेलाने तो चक्क काही सेकंदात कोट्यधीश झाला!

दक्षिण आफ्रिकेतील टी-२० लीगच्या सलामी लढतीत हे नाट्य घडले. एमआय केपटाऊन आणि डर्बन सुपर जायंटस् यांच्यातील या लढतीत एकूण ४४९ धावा कुटल्या गेल्या.एमआय केपटाऊनचा सलामीवीर रायन रिकेल्टनने ६५ चेंडूंत ११३ धावांची धडाकेबाज खेळी केली. १३व्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर रिकेल्टनने मारलेला षटकार प्रेक्षक गॅलरीतील एका चाहत्याने एक हाताने टिपला. या एका झेलमुळे त्या चाहत्याला दोन दशलक्ष रँड (सुमारे १.८ कोटी भारतीय रुपये) मिळाले.

एसए टी-२० स्पर्धेच्या नियमानुसार जर एखाद्या चाहत्याने सीमारेषेबाहेर एकहाती क्लीन कॅच टिपला, तर त्याला मोठी बक्षीस रक्कम दिली जाते, मात्र हा झेल केवळ एकाच हाताने टिपावा आणि तो क्लीन कॅच असावा, अशी अट असते. या दोन्ही अटी पार केल्याने हा चाहता काही सेकंदात कोट्यधीश झाला.

## ऑस्ट्रेलियाच्या लॉरा हॅरिसचे अवघ्या १५ चेंडूंत अर्धशतक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाची फलंदाज लॉरा हॅरिसने टी-२० क्रिकेटमध्ये अवघ्या १५ चेंडूंत अर्धशतक करत महिला टी-२० क्रिकेटमधील वेगवान अर्धशतकाच्या जागतिक विक्रमाशी बरोबरी केली. न्यूझीलंडमधील अलेक्झांड्रा येथील मॉलिनक्स पार्कवर सुरू असलेल्या विमेन्स सुपर स्मॅश स्पर्धेत कँटर्बरीविरुद्ध ओटागो संघातर्फे ३५ वर्षीय हॅरिसने हा पराक्रम गाजवला.



### जागतिक विक्रमाशी बरोबरी

हॅरिसने यासह इंग्लंडच्या मेरी केलीच्या विक्रमाशी बरोबरी केली. केलीने २०२२मध्ये वॉर्विकशायरकडून खेळताना ग्लूस्टरशायरविरुद्ध १५ चेंडूंत अर्धशतक झळकावले होते. ओटागो संघाकडून पदार्पण करणाऱ्या हॅरिसने १७ चेंडूंत ५२ धावांची खेळी केली. या स्फोटक खेळीत तिने सहा चौकार आणि चार उत्तुंग षटकार ठोकले. अखेर कँटर्बरीची जलद गोलंदाज गॅबी सुलिव्हनने तिला बाद केले. लॉरा हॅरिसच्या या झंझावाती खेळीमुळे ओटागोने १४६ धावांचे लक्ष्य केवळ १४.५ षटकांत सहा गडी राखून पूर्ण केले. तिच्या या शानदार कामगिरीसाठी तिला ‘प्लेअर ऑफ द मॅच’ पुरस्काराने गौरविण्यात आले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com